म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ५।०५
सं. क्र. ३२८
REFBK-0003155
REFBK-0003155

बोधणी

# ...द्यमणिमाला.

.... सं. ठाणें
काव्य
328
...१९२८६

महाराष्ट्र पब्लिशिंग हाउस, पुणें.

सं. ३१०५
८-९

# पद्यमणिमाला.

संपादक

प्रो. श्रीकृष्ण निलकंठ चापेकर,
एम. ए. एलएल. बी. डेक्कन कॉलेज, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रा. क्र. ३९४४

प्रकाशक

विश्वनाथ गणेश आणि मंडळी, पुणें.
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स, पुणें.

REFBK-0003155
REFBK-0003155

सन १९२६

किंमत १० आणे.

प्रकाशक—विश्वनाथ गणेश ताम्हणकर
बुधवार पेठ, पुणें शहर.
मुद्रक—गोपाळ बळवंत जोशी,
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें शहर.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| **भाग पहिला.** | |
| **१ नामदेव.** | |
| स्फुटअभंग ... ... ... ... ... | १ |
| **२ तुकाराम.** | |
| स्फुट अभंग ... ... ... ... ... | ८ |
| **३ मुक्तेश्वर.** | |
| सत्वविजय ... ... ... ... ... | १२ |
| **४ वामन.** | |
| सीतास्वयंवर ... ... ... ... ... | १५ |
| **५ मोरोपंत.** | |
| प्रारब्धयोग ... ... ... ... ... | १८ |
| स्फुट केका ... ... ... ... ... | २२ |
| **भाग दुसरा.** | |
| **६ ज्ञानेश्वर.** | |
| अमानित्व ... ... ... ... ... | २५ |
| क्षमा ... ... ... ... ... | २७ |
| **७ एकनाथ.** | |
| संतांचीं लक्षणें ... ... ... ... ... | २८ |
| **८ श्रीसमर्थ रामदास.** | |
| चातुर्यलक्षण ... ... ... ... ... | ३१ |
| पराधीन पंचक ... ... ... ... ... | ३४ |

९ श्रीधर.

भद्रायुनीति ... ... ... ... ... ३८

१० परशुराम तात्या गोडबोले.

उत्तररामचरित्र नाटक ... ... ... ... ४२

११ केशवसुत.

दिवा आणि तारा ... ... ... ... ... ५३
विद्यार्थ्यांप्रत ... ... ... ... ... ५४

१२ राम गणेश गडकरी.

कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ?... ... ... ... ५६
चेंडू ... ... ... ... ... ... ५८

१३ दत्त.

विश्वामित्रांच्या कांठीं ... ... ... ... ६०

१४ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

आगगाडी ... ... ... ... ... ६३

१५ अनंततनय.

वरची वाट ... ... ... ... ... ६५

१६ नारायण केशव बेहेरे.

होनाजी बाळ ... ... ... ... ... ६८

१७ आनंद कृष्ण टेकाडे.

प्रेमाची खूण ... ... ... ... ... ७१

१८ माधव गोविंद भिडे.

चंडोलास ... ... ... ... ... ७३

G. S. Talwarkar
B. J. High School
Thana
Std VII B.

# पद्यमणिमाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ..............

# प्रस्तावना.

सध्यां मराठी भाषेचा पद्धतशीर व वाङ्मयदृष्ट्या रसिक सूक्ष्मतेनें अभ्यास करण्याची प्रवृत्ति अधिकाधिक वाढत आहे. विश्वविद्यालयांतील शेवटच्या दोन उच्च परीक्षांच्या अभ्यासक्रमांत एक ऐच्छिक भाषा या नात्यानें मराठीला स्थान मिळालेंच आहे; आणि त्यांच्या खालच्या दोन्ही परीक्षांतही तिचा लवकरच प्रवेश होण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत. अशा वेळीं दुय्यम शिक्षणाच्या शाळांतील वरच्या इयत्तांतही मराठीचा पायाशुद्ध व अलीकडील प्रगल्भ दशेस पावत चाललेल्या वाङ्मयशास्त्राच्या सर्वसंमत नियमानुसार अभ्यास करण्याचा प्रघात पडणें अत्यंत इष्ट व अवश्य आहे.

यास्तव, अशा अभ्यासाच्या पद्धतीचें किंचित् दिग्दर्शन म्हणून, . याखालीं, सामान्यतः कोणत्याही चांगल्या वाङ्मयाचे मुख्य गुण आणि **गद्य** व **पद्य** यांच्या स्वरूपांतील ठोकळ विशेष यांच्या संबंधीं अगदीं सूत्ररूपानें पण शक्य तितक्या सुबोध रीतीनें विवेचन केल्यास तें अस्थानीं होणार नाहीं; उलट, प्रस्तुत "**मणिमालें**" तील उताऱ्यांची छाननी करण्यास आणि त्यांपैकीं प्रत्येकांतील निरनिराळ्या रम्य विशेषपणांचा योग्य आस्वाद घेण्यास अशा विवेचनानें साधारण वाचक किंवा विद्यार्थीवर्ग यांस थोडाबिहुत जास्त मदतच होईल, असें आम्हांस वाटतें. म्हणून आतां त्या विवेचनाकडे वळतों.

गद्य असो, पद्य असो, समग्र ग्रंथ असो अथवा त्रोटक उतारा असो, कोणत्याही वाङ्मयविषयक कृतीच्या चांगुलपणाची कसोटी तिच्यांतील तीन 'क' कारात्मक घटक अथवा अंश यांच्यावर अवलंबून असते. हे तीन घटक म्हटले म्हणजे **कथित, कलांग** व **कथ्य** हे होत. 'कथित' म्हणजे अर्थात् ग्रंथकारानें अथवा कवीनें जो विषय प्रत्यक्ष सांगितला असेल तो; 'कलांग' म्हणजे तो ज्या रचना चातुर्यानें, निवेदनाच्या कौशल्यानें अथवा भाषाशैलीच्या स्वाभाविक हतोटीनें सांगितला व वठविला असेल तें चातुर्य अथवा ती स्वाभाविक हतोटी; 'कथ्य' म्हणजे 'सांगण्यास योग्य' 'सांगतां येण्याजोगें.' 'कथ्य' हें दोन प्रकारचें होऊं शकतें. ग्रंथकारानें अथवा कवीनें आपल्या 'कथितांत

जें प्रत्यक्ष सांगितलें असेल त्याच्याखेरीज, त्याला त्याविषयीं सहेतुक अथवा गर्भित रीतीनें ( यालाच वाङ्मय अथवा साहित्यशास्त्रांत **ध्वन्यर्थानें** अथवा **व्यंग्यार्थानें** अशी संज्ञा आहे. ) जें विशेष सांगावयाचें-सुचवावयाचें-असतें, तें एक प्रकारचें ' कथ्य ' होय. याशिवाय ग्रंथकारानें किंवा कवीनें केलेल्या विषयाच्या वर्णनावरून अथवा प्रतिपादनावरून, फलित अनुमानांच्या नात्यानें, विचारी व रसिक वाचकांनाही आपापल्यापरी त्याविषयासंबंधीं, साधक बाधक, पोषक, विस्तारक, असें जें ' सांगण्याजोगें ' सुचतें, तें दुसऱ्या प्रकारचें ' कथ्य ' होय. निरनिराळ्या मनोवृत्तींच्या व भिन्न भिन्न संस्कारांच्या वाचकांना, आपापली परिस्थिति व अनुभव यांस अनुसरून, एकाच ग्रंथावरून अनेक प्रकारचीं ' कथ्यें ' सुचणें हेंच त्या ग्रंथाच्या चांगुलपणाचें सर्वांत उत्तम द्योतक असतें. कोणत्याही भाषेच्या वाङ्मयांत जे नामांकित, शिष्ट अथवा अभियुक्त ( Classical. ) ग्रंथकार किंवा ग्रंथ म्हणून गणले जातात, त्यांचें वरवर देखील परीक्षण केल्यास, त्यांत **कथित, कलांग** व **कथ्य** या तीन घटकांपैकीं कोणत्याना कोणत्या तरी एका घटकाचा बाकीच्या दोघांहून विशेष उत्कर्ष, किंवा तिन्ही घटकांचें मिळून झालेलें रम्य असें मिश्रण, आणि क्वचित्, तिन्ही गुणांचा असाधारण उत्कर्ष हेंच यशाचें बीज असल्याचें दिसून येईल.

चांगल्या वाङ्मयाच्या मुख्य गुणांचें गद्यात्मक आणि पद्यात्मक अशा दोन्ही प्रकारच्या रचनेला सारखेंच लागू पडेल असें येथवर दिग्दर्शन केलें. आतां, याच गुणांच्या संबंधानें **गद्य** व **पद्य** यांच्या स्वरूपांत कोणकोणते ठोकळ फरक आहेत तें थोडक्यांत दर्शवितों.

' गद्य ' याचा यौगिक ऊर्फ धात्वर्थ पाहिल्यास तो ' बोलण्यास योग्य ' ' नुसतें ( गायन, छंद, चाल, वृत्त वगैरेनीं विरहित ) म्हणावयाचें ' असा आहे. म्हणजे सामान्यतः, जगाच्या नेहमींच्या व्यवहारांत एकमेकांना सहजगत्या समजेल अशा भाषेंत लहानमोठ्या, साध्या अथवा गहन, व्यापक व शाश्वत किंवा मर्यादित व तात्पुरत्या महत्त्वाच्या विषयासंबंधीं विचार व्यक्त करणें, ज्ञान अथवा माहिती देणें, वगैरेसाठीं जी रचना केली जाते, तें **गद्य** असें म्हणण्यास हरकत नाहीं. ' **गद्यांत** ' **रचनेचा सरळपणा** आणि अर्थाची **असंदिग्धता व उघडपणा ऊर्फ सुबोधपणा** हे दोन गुण मुख्यतः असावे लाग-

तात. इंग्रजींतील ' Prose ' या शब्दाचा धात्वर्थही ' **सरळ व स्पष्ट भाषण** ' असाच आहे. यांपैकीं पहिला गुण–रचनेचा सरळपणा–हा व्याकरण म्हणजे भाषाशुद्धीचे नियम यांचें यथोचित पालन केल्यानें साध्य होऊन, त्याच्यायोगानें दूरान्वय, क्लिष्ट अथवा कर्णकटु वाक्यरचना इत्यादि दोष बहुधा टाळतां येतात. अर्थाचा असंदिग्धपणा अथवा उघड--स्पष्ट–पणा साध्य होण्यास निरनिराळ्या शब्दांच्या अर्थद्योतकतेच्या व्याप्तीचें योग्य व बिनचूक ज्ञान आणि आपल्यास काय म्हणावयाचें आहे त्याची आपली आपल्यास निश्चित कल्पना असणें, या दोन गोष्टींची आवश्यकता असते. नाहीं तर भलताच शब्द भलत्याच अर्थी योजला जाऊन अर्थाचा अनर्थ किंवा रसाचा विरस होतो. जेथें स्तुति करण्याचा हेतु असेल तेथें निंदेचा ध्वनि उमटतो; गौरव दर्शवावयाचा असेल तेथें कमी-पणा सूचित होतो.

**पद्या**चा, म्हणजे मुख्यतः चांगल्या काव्याचा, उद्देश, कल्पनाशक्तीच्या प्राधान्यानें आणि रचनेच्या मनोवेधक मोहकतेनें, लौकिक विषयांचें किंवा आत्मगत मनोवृत्तींचें रम्य प्रदर्शन करून, व्यवहारनिरपेक्ष आल्हाद व आनंद यांचा आस्वाद घेणें व इतरांस तो करून देणें आणि तद्द्वारां उभयतांच्या मनास सुखित व उन्नत करणें, हा असतो. हा उद्देश साध्य होण्यास गद्याप्रमाणें पद्यांतही अर्थाच्या सुबोधतेची आवश्यकता आहेच. म्हणून **पद्याला** एक प्रकारें, रम्य चमत्कृति उत्पन्न करण्याकरितां ज्यांत शब्दांची सरकासरकी व फिरवा-फिरवी केलेली असते असें गद्यच, असें म्हणतां येईल. तसेंच केव्हां केव्हां शब्दांची अशी फिरवाफिरव किंवा सरकासरकी न करितांही सहजगत्या लिहिलेल्या नुसत्या गद्यांत देखील रचनेची चमत्कृति किंवा त्यांतील सूचित अर्थाची सहजरम्यता यांचा विशेष उत्कटपणें प्रत्यय येतो. कधीं कधीं अशा प्रकारच्या गद्याला ' काव्यमय गद्य,' असें नांव देतात तें याच विचारसरणीचें द्योतक आहे.

"गद्य" "पद्य" यांतील हा फरक, १५ रुपये म्हणजे एक पौंड किंवा श्रीखंड म्हणजे गोड पिठलें अशासारखा केवळ सापेक्ष व एकदेशीय स्वरूपाचा झाला. पण याच्याहीं पेक्षां, " गद्य " व " पद्य " यांच्यांतील भेद स्पष्ट करणारा असा " पद्या "चा एक महत्त्वाचा विशेष आहे. तो म्हटला म्हणजे " पद्य " हे प्रायः शब्दांची व अक्षरांची सहेतुकपणें गायनानुकूल व चमत्कृतिजनक अशी जुळणी करूनच रचलेलें असतें. प्रासानुप्रास, यमकें वगैरे प्रकार याच

तत्त्वाचे निदर्शक आहेत; आणि गद्यवजा रचनेंत थोडाफार फरक करून "पद्य" निर्माण करणें हा देखील या चमत्कृतिजनक जुळणीचाच एक प्रकार आहे. "गद्य" "पद्यां" तील दुसरा महत्त्वाचा फरक म्हटला म्हणजे "गद्या" चें ध्येय, सामान्यतः, **वाच्यार्थाची असंदिग्धता व सुबोधता**, हें असतें, तर "पद्या" चें अथवा **काव्याचें खरें स्वारस्य शब्दांच्या लाक्षणिक व अंतर्ध्वनिपूर्ण अर्थाच्या रम्यतेंत असतें.**

"गद्या" चें व 'पद्या' चें ध्येय आपापल्यापरी साध्य होण्यास ज्या भिन्न भिन्न कौशल्याची आवश्यकता आहे, तेंच त्याचें विशिष्ट **कलांग** होय. म्हणजे "**गद्यां**" त लेखकाच्या मनोरचनेचा व विचारसरणीचा अनन्यसाधारण विशेषपणा उर्फ **व्यक्तित्व** दर्शविणाऱ्या **भाषाशैलीचें महत्त्व असतें**; तर काव्यांत, कवीची विशिष्ट मनोवृत्ति व विचारप्रवृत्ति यांच्याजोडी इतकेंच, **काव्यरचनेचा चित्ताकर्षक व सहजरम्य ठाकठीकपणा** या गुणाचेंही माहात्म्य प्रमुख असतें. ज्या 'पद्यां' त अथवा काव्यांत, रचनेचा हा सहजरम्य ठाकठीकपणा नीटपणें साधला जाऊन, शिवाय त्यांत जर अनेक प्रकारचे रम्य अंतर्ध्वनिही सूचित होत असतील, तर तें काव्य प्रसादपूर्ण व उत्तम असें समजावें.

मराठी भाषेचा आस्थेवाईकपणानें व स्वाभिमानाच्या वृत्तीनें अभ्यास करण्याची प्रवृत्ति आपल्यांत अधिकाधिक वाढत आहे, याचें उत्तम प्रमाण म्हटलें म्हणजे, जुन्या व नव्या कवींच्या काव्यांबद्दल लोकमतांत झालेला अभिनंदनीय फरक हें आहे. मराठींतील जुने कवि ( श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव वगैरे कांहीं संत कवी खेरीज करून ) हे कवीच नव्हत, केवळ भक्तीच्याच पायावर रचलेलीं काव्यें हीं खरीं काव्येंच होऊं शकत नाहींत, **मोरोपंत** म्हणजे नुसता भाषांतऱ्या; व संस्कृत शब्दावडंबर माजविणारा व एकशें आठ रामायणें रचण्याची कसरत करून ईश्वरदत्त बुद्धीच्या अमोल देणगीचा अपव्यय करणारा मूढ रचनाकार; **वामनपंडित** म्हणजे यमकें व प्रासानुप्रासादि कृत्रिम अलंकारांच्या भाराखालीं कवितादेवीस जर्जर करणारा आणि वेळीं अवेळीं वेदांताच्या चर्चेचें एरंडाचें गुऱ्हाळ चालविणारा रुक्ष कठोर पांडित्यप्रिय असा **मोरोपंताचाच** वडील भाऊ—अशा प्रकारचे जुन्या कवींसंबंधीं भ्रामक, अज्ञानजन्य व तुच्छतादर्शक अभिप्राय, एकपक्षी, मोठमोठ्या विद्वानांकडूनहि व्यक्त केले जात; तर

उलट पक्षीं, जुन्या कवितेचे अंधपक्षपाती लोक नव्या कवितेसंबंधीं, तीं अलीकडील चारगट व टारग्या तरुणांची कपिचेष्टा आहे, जिच्यांत ईश्वरनामस्मरण व त्याचें लीलागुणवर्णन नाहीं अथवा जिच्यांत श्लेष, प्रासानुप्रास, यमकादि चित्रप्रकार नाहींत ती कविताच नव्हे, दऱ्याडोंगर, नद्यानाले, झाडें, पक्षी, कुत्रींमांजरें, बायकापोरें वगैरे लौकिक विषयाच्या वर्णनपर केलेली कविता अधम प्रकारची कविता होय; नव्या कवींमध्यें खरी प्रतिभा, कल्पकता, भाषावैभव वगैरे गुण दिसावयाचेच नाहींत–अशा तऱ्हेच्या पूर्वग्रहांनीं दूषित व प्रतिनिविष्ट होऊन बसलेले असत. सुदैवानें ही दोन्ही प्रकारची दुःस्थिति गेल्या ५।१० वर्षांत बऱ्याच अंशीं दूर होत चालली आहे. भक्तिरसाचा ओलावा हाही खऱ्या काव्याचा आत्मा होऊ शकतो, मोरोपंत व वामन पंडित यांच्यांतही खरी काव्य प्रतिभा होती, मराठी भाषेचें सामर्थ्य व वाग्वैभव यांच्या प्रकटीकरणाच्या दृष्टीनें, जुन्या कवींची योग्यता फार मोठी आहे, तसेंच, खऱ्या कवित्वाच्या आविष्कारास, जुन्या कवींच्या ग्रंथांचा अभ्यास व भाषावैभवाची संपादणी या दोहोंचीही आवश्यकता आहे–या गोष्टी नव्या लोकांना आतां बहुधा सर्वसंमत झाल्या आहेत; उलटपक्षीं, नवीन काल वर्तमानानुरूप, काव्याचे विषय व ते चित्रित करण्याच्या निरनिराळ्या भाषापद्धति व रचनाप्रकार हे बदलले असले तरी, नव्या कवितेंतही उज्ज्वल प्रतिभेचा व आल्हाददायक रचनाचातुर्याचा पुष्कळ अंश सांपडण्यासारखा आहे, अशी जुन्या कवींच्या अभिमान्यांचीही समजूत पटून ते नव्या कवितेंतील चांगल्या अंशाचा सहृदयतेनें आस्वाद घेण्याची आतुरता दर्शवूं लागले आहेत. ‘ मणिमाले ’ च्या प्रिय वाचकांसाठीं, या दोन्ही प्रकारच्या काव्यपद्धतीचे कित्येक उत्तम नमुने पुढील उताऱ्यांत संगृहीत करण्याचा यथाशक्य प्रयत्न केला आहे.

तांदूळ, मोतीं, कापड वगैरेंच्या बाबतींत, जसे एकाच वेळीं अनेक नमुने आपल्यापुढें मांडले असतां, संसारी दृष्टीनें, आपण आपल्याला त्यांचे भिन्न भिन्न भाव अथवा किंमती कितपत परवडतात न परवडतात, याबद्दलचा विचार तर करतोंच; पण त्याच्याच बरोबर, निरनिराळ्या नमुन्यांत इतरांपेक्षां कमी अधिक विशेष काय आहेत हें पाहण्याकडेही आपली रसिक दृष्टि स्वाभाविकपणें लागतेच; तोच न्याय प्रस्तुत ‘ मणिमाले ’ सारख्या निवडक उताऱ्यांच्या पुस्तकासंबंधीं लागू पडतो. अशा पुस्तकांचा उपयोग केवळ नवीन वाचनाभिरुचि लागावी किंवा

असलेली वाढावी इतक्याच पुरता मर्यादित नसतो–निदान तो तसा मर्यादित नसला पाहिजे; तर उलट, अशा पुस्तकांतील कोणत्याही एखाद्या उताऱ्यांतला विशेष काय आहे, हें वाचकाच्या नजरेंत चटकन भरून, त्याचा योग्य आस्वाद घेण्याची पात्रता व रसिकताही त्या पुस्तकाच्या योगानें त्याच्या हृदयांत थोड्या बहुत अंशानें तरी विकसित झाली पाहिजे; व तरच त्यांच्या वाचनाचा खरा उपयोग व सुपरिणाम झाला असें म्हणतां येईल. हेंच तत्व मनांत वागवून पुढील उतारे निवडण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे हें ठरविण्याचें काम सुज्ञ व सहृदय वाचकवर्गाचें आहे. तें ते प्रांजळपणानें बजावितीलच.

'गद्य' व 'पद्य' मणिमाला पुस्तकांत उतारे घेण्याची परवानगी दिल्याबद्दल मी पुढील सद्गृहस्थांचा अत्यंत आभारी आहें:–श्री. न. चिं. केळकर, श्री. वामन रावजी पटवर्धन, ( आर्यभूषण छापखाना ) प्रो. वा. म. जोशी, श्री. गोळे, श्री. भवाळकर, श्री. शंकरराव गडकरी, श्री. श्री. कृ. कोल्हटकर, श्री. दामले, श्री. विठ्ठलराव घाटे, श्री. माधवराव भिडे, श्री. आनंदरावजी टेकाडे, प्रो. ना. के. बेहेरे, श्री. अनंततनय.

शेवटीं, कविवर्य **मोरोपंत** व संतशिरोमणी **श्रीज्ञानेश्वर** यांच्या दोन मार्मिक व प्रासादिक वचनांचा अनुवाद करून, मी ही प्रस्तावना पुरी करितों:–

॥ ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेहबिंदु ही फार ॥
॥ सारज्ञ असूयोज्झित त्यांला माझा असो नमस्कार ! ॥ १ ॥

**मोरोपंत. ( मंत्ररामायण. )**

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणि–जात. ॥

**श्रीज्ञानेश्वर.**

पुणें, ता० ३०–५–२६.
संकष्टी चतुर्थी, आधिक ज्येष्ठ, शके १८४८.

**श्री. नि. चापेकर.**

# पद्यमणिमाला.

## भाग पहिला.

दा. क्र. 3944

१.

## नामदेव.

( श. ११९२–१२७२. )

### स्फुट अभंग.

१.

हरिदासपणें उभविलें ध्वज ।
परि तें वर्मबीज न कळेची ॥ १
काय करूं देवा जळो याची बुद्धि ।
जोंवरी नाहीं शुद्धि परलोकाची ॥ २
मुद्रा धरूनि गळां घाली तुळसीमाळा ।
परि नाहीं जिव्हाळा स्वहिताचा ॥ ३
धरी बहु वेष वृथा करी दोष ।
नाम ब्रह्मरस अंगीं नाहीं. ॥ ४
दुसरा हरिदास देखुनियां रंगीं ।
धांवोनियां वेगीं ग्रासों पाहे. ॥ ५

दुसरियाचें पद ऐकोनियां कानीं ।
क्रोधें पेटे वन्हि पर्वतींचा ॥ ६

दुर्जनाचे भयें पळतीं साधुवृंदें ।
जैसीं तीं श्वापदें व्याघ्रा भेणें ॥ ७

बोले नानायुक्ति वश करी सभा ।
दुसरा रंगीं उभा राहों नेदी. ॥ ८

राजमानें श्रेष्ठ मोठा अधिकारी ।
त्यापुढें कुसरी करिताती. ॥ ९

घातमात करी नटे नानापरी ।
चंचळ परनारी भुलवितो ॥ १०

ऐसें नाम विटंबूनि करील जो हरिकथा ।
तेणें परमार्था विघ्न केलें ॥ ११

जाई जुई उत्तम सुगंध कस्तुरी ।
विष्टेच्या उदरीं आंथुरिल्या ॥ १२

साडेपंधरा सोनें होतें पालवण्या ।
परि झालें हीण डांक लागे ॥ ३१

द्यावें दिव्यौषध रोगियाचें हित ।
केलिया कुपथ्य वांयां जाय ॥ १४

चतुर्विध अन्न षड्रस पक्वानें ।
निटाळलें जाण श्वानमुखें ॥ १५

ऐसें म्हणतां माझी मळेल पैं वाचा ।
परि या वैष्णवांचा धर्म नव्हे ॥ १६

संसारसागरु हरिकथा तारूं ।
तरिजे विचारू दुरी ठेला ॥ १७
जे कथा ऐकती पसरोनी बाह्या ।
शांति क्षमा दया येती तेथें ॥ १८
शांति क्षमा दया येती भेटावया ।
तेथें मोक्ष व्हावया विलंब काय ॥ १९
आनंद नामाचा ऐकूनि गजर ।
ब्रह्मादिक हरिहर येती तेथें ॥ २०
खुंटला अनुवाद मावळला शब्द ।
अनिर्वाच्य बोध प्रगटला ॥ २१
वैकुंठ सांडून धांवे चक्रपाणि ।
कीर्तनाच्या ध्वनि ऐकूनियां ॥ २२
तेथें श्रोते वक्ते होतील निःशाप ।
ऐशी पुण्यरूप हरिकथा ॥ २३
शून्याचें निःशून्य जेथें हरपलें ।
एकाग्र मन झालें ध्यान तेथें ॥ २४
नामा म्हणे माझी हरिकथा माउली ।
मोक्षपान्हा घाली भक्तालागीं ॥ २५

२

भूमीचें मार्दव । सांगे कोंभाची लवलव
तैसे आचारगौरव । सुकुलीन जनाचे ॥ १
झाड जाणावें फुलें । मानस जाणावें बोलें
भोगें जाणावें केलें । जन्मांतरींचें ॥ २

लोभ जाणावा उभय दृष्टी । क्रोध जाणावा भोंवया गांठीं
लटिका जाणावा बहु गोष्टी । नष्ट प्रकृति ओळखावा ॥ ३

द्रोही घातलिया जाणावा खरा
टोकळ जाणावा कली अवसरा ।
परद्वारिणी जाणावी उण्या उत्तरीं
कुश्चळी घरोघरीं हिंडतसे ॥ ४

मृदंग जाणावा गंभीर नादें । गाणें जाणावें सुस्वर शब्दें ।
ओंकार जाणावा अक्षरभेदें । शाहाणा शब्दें ओळखावा ॥ ५

विष्णुदास नामा करी विनंती
या उत्तराची न मानावी खंती ।
केशवाचा प्रसाद आहे माझे चित्तीं
देवा काय करिसी तें न कळे ॥ ६

३

सुवर्ण आणि परिमळ । हिरा आणि कोमळ
योगी आणि निर्मळ । हें दुर्लभ जी दातारा ॥ १

देव जरी बोलता । कल्पतरू तरी चालता
गज जरी दुभता । हें दुर्लभ जी दातारा ॥ २

धनवंत आणि दयाळु । व्याघ्र आणि कृपाळु
अग्नि आणि सतिळु । हें दुर्लभ जी दातारा ॥ ३

सुंदर आणि पतिव्रता । सावधान होय श्रोता
पुराणिक तरी ज्ञाता । हें दुर्लभ जी दातारा ॥ ४

क्षत्रिय आणि शूर भला । चंदन फुलीं फुलला
स्वरूपीं गुण व्यापिला । हें दुर्लभ जी दातारा ॥ ५

ऐसा संपूर्ण सर्व गुणीं । केंवीं पाविजे शारंगपाणी
विष्णुदास नामा करी विनवणी । मुक्ति चरणीं त्याचिया ॥ ६

४

एक म्हणती आम्ही देवचि जालों
तरी असे नका बोलों पडाल पतनीं ॥ १
एक म्हणती आम्ही देवासमान
तरी घासील वदन यमराय ॥ २
एक म्हणती आम्ही देवाचींच रूपें
तुमच्यानि बापें संसार न तुटे ॥ ३
देवें वधियेलें दानवां दैत्यां
आम्ही आड जातां तृण न मोडे ॥ ४
देवें उचलिल्या शिळा मेदिनी
तुमचेनी एक गोणी नुचले देखा ॥ ५
विठ्ठलाचें पद जो कोणी अभिलाषी
तो महा पातकी म्हणे नामा ॥ ६

५

त्यागेंवीण विरक्ति । प्रेमावांचूनि भक्ति
शांति नसतां ज्ञप्ति । शोभा न पवे ॥ १
दमनें वाचूनि यति । मानाविण भूमिपति
योगि नसतां युक्ति । शोभा न पवे ॥ २

बहिर्मुख लावि मति । नेमावांचूनियां वृत्ति
बोधेंविण महंती । शोभा न पवे ॥ ३
अनधिकारीं व्युत्पत्ति । गुरु तो कनिष्ठ याति
माता नीच कुलटावृत्ति । शोभा न पवे ॥ ४
हेतुवांचूनि प्रीति । गुणरहित स्तुति
करणीवांचूनि कीर्ति । शोभा न पवे ॥ ५
सत्समागमसंगती । वाणली नसतां चित्तीं
नामा म्हणे क्षिति । शोभा न पवे सर्वथा ॥ ६

६

दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां
येणें साधूं प्रेमा राघोबाचा ॥ १
अवघे हातोहातीं तरों भवसिंधु
आवडीनें गोविंदु गाऊं गीतीं ॥ २
हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां
शोक मोह दुःखा निरसूं तेणें ॥ ३
एकमेकां करूं सदा सावधान
नामीं अनुसंधान तुटों नेदूं ॥ ४
घेऊं सर्वभावें रामनाम दीक्षा
विश्वासें सकाळिकां हेंचि सांगों ॥ ५
नामा म्हणे शरण रिघों पंढरीनाथा
नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ॥ ६

७

पापाचें संचित देहासी दंडण
तुज नारायणा ! बोल नाहीं ॥ १
सुख अथवा दुःख भोगणें देहासी
सोस वासनेसी वाउगाची ॥ २
पेरि कडु जीरें इच्छी अमृतफळ
अर्कवृक्षा केळीं केविं येतीं ॥ ३
मुसळाचें धनु न होय सर्वथा
पाषाण पिळितां रस कैंचा ॥ ४
नामदेव म्हणे देवा कां रुसावें
मनाला पुसावें आपुलीया ॥ ५

बहिर्मुख लावि माति । नेमावांचूनियां वृत्ति
बोधेंविण महंती । शोभा न पवे ॥ ३

अनाधिकारीं व्युत्पात्ति । गुरु तो कनिष्ठ याति
माता नीच कुलटावृत्ति । शोभा न पवे ॥ ४

हेतुवांचूनि प्रीति । गुणरहित स्तुति
करणीवांचूनि कीर्ति । शोभा न पवे ॥ ५

सत्समागमसंगती । बाणली नसतां चित्तीं
नामा म्हणे क्षिति । शोभा न पवे सर्वथा ॥ ६

६

दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां
येणें साधूं प्रेमा राघोबाचा ॥ १

अवघे हातोहातीं तरों भवसिंधु
आवडीनें गोविंदु गाऊं गीतीं ॥ २

हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां
शोक मोह दुःखा निरसूं तेणें ॥ ३

एकमेकां करूं सदा सावधान
नामीं अनुसंधान तुटों नेदूं ॥ ४

घेऊं सर्वभावें रामनाम दीक्षा
विश्वासें सकळिकां हेंचि सांगों ॥ ५

नामा म्हणे शरण रिघों पंढरीनाथा
नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ॥ ६

७

पापाचें संचित देहासी दंडण
तुज नारायणा! बोल नाहीं ॥ १

सुख अथवा दुःख भोगणें देहासी
सोस वासनेसी वाउगाची ॥ २

पेरि कडु जीरें इच्छी अमृतफळ
अर्कवृक्षा केळीं केविं येतीं ॥ ३

मुसळाचें धनु न होय सर्वथा
पाषाण पिळितां रस कैंचा ॥ ४

नामदेव म्हणे देवा कां रुसावें
मनाला पुसावें आपुलीया ॥ ५

## २.

# तुकाराम.

( श. १५३०–१५७१ )

## स्फुट अभंग

१

सांटविले वाण । पैस घातला दुकान ॥ १
जें ज्या पाहिजे जे काळीं । आहे सिद्धचि जवळी ॥ २
निवाडिलें साचें । उत्तम मध्यम कनिष्ठाचें ॥ ३
तुका बैसला दुकानीं । दावी मोला ऐसी वाणी ॥ ४

२

कास घालोनी बळकट । झालों कळिकाळासी नीट
केली पायवाट । भवसिंधूवरूनि ॥ १
या रे या रे लहान थोर । याती भलते नारीनर
करावा विचार । न लगे चिंता कोणासी ॥ २
कामीं गुंतले रिकामे । जपी तपी येथें जमे
लाविले दमामे । मुक्ता आणि मुमुक्षा ॥ ३
एकंदर शिक्का । पाठविला इहलोका
आलों म्हणे तुका । मी नामाचा धारक ॥ ४

३

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ॥ १

झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग
उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ॥ २
अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें
विषयलोभी मनें । साधनें बुडविलीं ॥ ३
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा
तुका म्हणे करा । जय जयकार आनंदें ॥ ४

४

वैष्णव तो जया । अवघी देवावरी माया ॥ १
नाहीं आणीक प्रमाण । तन धन तृण जन ॥ २
पडतां जड भारी । नेमा न टळे निर्धारीं ॥ ३
तुका म्हणे याती । हो का तयाची भलती ॥ ४

५

एकांचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥ १
ऐशा देवाच्या विभूति । भिन्न प्रारब्धाची गती ॥ २
एकांचीं वचनें । कटु अत्यंत तीक्ष्णें ॥ ३
प्रकाराचे तीन । तुका म्हणे केले जन ॥ ४

६

वचनेंही नाड । न बोले तें मुकें खोड ॥ १
दोहीं वेगळें तें हित । बोली अबोलणी नीत ॥ २
अंधार प्रकाशीं । जाय दिवस पावे निशी ॥ ३
बीज पृथिवीच्या पोटीं । तुका म्हणे दावी दृष्टी ॥ ४

७

विचारा वांचून । न पाविजे समाधान ॥ १
देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुधा ॥ २
देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ॥ ३
तुका म्हणे होतें । बहु गोमटें उचितें ॥ ३

८

चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥ १
तैसी नव्हे भोळी सेवा । एक भावचि कारण देवा ॥ २
तपें इंद्रियां आघात । क्षणें एका वाताहात ॥ ३
मंत्र चळे थोडा । तरि धडाचि होय वेडा ॥ ४
व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥ ५
धर्म सत्वाचि कारण । नाहीं तरी केला सिण ॥ ६
भूतदयेसि आघात । उंचनीच वाताहात ॥ ७
तुका म्हणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ॥ ८

९

मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहें ॥ १
तयापरी करीं स्वहित आपुलें । जया सी फावलें नरदेह ॥ २
ओटीच्या परिस मुठींचें तें वाढे । यापरि कैवडें स्वहिताचें ॥ ३
नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ॥ ४
तुका म्हणे पाहें आपुली सूचना । करितों शाहाणा मृत्युलोकीं ॥ ५

१०

राजा चाले तेथें वैभव सांगातें। हें काय लागतें सांगावें त्या ॥ १
कोणी कोणा येथें न मनी जी फुका। कृपेविण एका देवाचिया ॥ २
शृंगारिलें नाहीं तगों येत वरि। उमटे लौकरि जैसें तैसें ॥ ३
तुका म्हणे घरीं वसे नारायण। कृपेचि ते खुण साम्या येते ॥ ४

११

वत्स पळे धेनु धांवे पाठींलागीं। प्रीतीच्या तो अंगीं आविर्भाव ॥ १
शिकविलें काय येईल कारणा। सूत्र ओढी मना आणिकांच्या ॥ २
सांडिलें तें नाहीं येत मेळवितां। म्हणऊनि लाता मागें सारी ॥ ३
तुका म्हणे आग्रह करावा न लगे। सांगतसे अंगें अनुभव ॥ ४

## ३.

# मुक्तेश्वर.

(श. १५३४)

—:*:—

## सत्त्व-विजय !

(हरिश्चंद्राख्यानांतील ओंव्या.)

स्नान घालूनि गंगाजळें । उभी केली अधोमौळें
निज वल्कभें शस्त्र तेजाळें । काढुनी अंचळें पुशिलें ॥ १
सत्व पहावया गगनीं । गण गंधर्व निर्जर मुनी
सतियांसहित विमानीं । कौतुक पाहों पातले ॥ २
सुवर्णेसी सहस्रकिरण । सहरोहिणी निशारमण
स्वाहास्वधेशीं उभयवदन । समीर वरुण धनदायी ॥ ३
शची सहित वज्रपाणी । धर्मसंगीं संयमिनी
मुनिसंगें मुनिभामिनी । विमानयानीं पाहती ॥ ४
सहतारा बृहस्पती । वसिष्ठऋषि अरुंधती
अत्रीसह अनसूया सती । सत्व पाहों पातली ॥ ५
रमेसहित मदनारिमित्र । सहसावित्री चतुर्वक्त्र
उमेसहित विषमनेत्र । पाहती सत्व सतीचें ॥ ६
नृपसत्वद्रुमाच्या मूळीं । वसिष्ठ वोपी सुकृतांजली
तया तोयें शाखापूर्ण बाहाळी । कवळूनि जाती चिद्गगनीं ॥ ७
वैकुंठ कैलास ब्रम्हपदें । ऐशिया फळीं फळला स्वादें
स्वयें तृप्त स्वानंदबोधें । चाड न धरी तयांची ॥ ८

तंव दूत म्हणती, ' खेचरी ! । आतां कुलदेवता स्मरण करीं
जयाची इच्छा पूर्ण अंतरीं । चिंतन करीं तयाचें '॥ ९
सुकुमार बैसुनी पद्मासनीं । स्वरूपमुद्रा लाविली ध्यानीं
हृदयीं स्मरोनी चक्रपाणी । काय बोले कुरुवर्या ! ॥ १०
म्हणे, ' आतां जन्मची नसावा । प्रारब्ध भोगवी जरी जीवा
तरी मागणें हेंचि देवा ! । जन्मोजन्मीं इच्छितें ॥ ११
हरिश्चंद्रासारिखा कांत । रोहिदासासारिखा सुत
कुळगुरु अरुंधतीनाथ । जन्मोजन्मीं असावा ॥ १२
प्रतिसृष्टीचा अपर धाता । तपो तेजें तीव्र सविता
तोचि जन्मोजन्मीं मागता । याचक असो कौशिक' ॥ १३
ऐसें बोलोनि नृपभामिनी । हनना वोढवी मूर्ध्नी
शस्त्र पडावें तर ते क्षणीं । विश्वामित्र धाविन्नला ॥ १४
वल्कलवसनें जटाधारी । विभूति चर्चुनी शरीरीं
हुताशन नेत्रीं मिरवे, करीं । दंडकमंडलु साजिरा ॥ १५
शुद्ध सत्वकळाषोडशीं । पूर्ण देखोनी नृपशशी
कौशिकहृदय पूर्णसिंधूसी । प्रेमभरतें दाटलें ॥ १६
प्रतिज्ञा लंघुनी वल्लरी । नयनीं लोटल्या अश्रुलहरी
उदित हातें वरिच्यावरी । शस्त्र धांवोनि धरियेलें ॥ १७
कौशिक कृपेच्या वरदवातें । डोलती विबुध पारिजातें
सुकृतसुमनें परागभरितें । राजमुकुटीं वर्षती ॥ १८
हरिश्चंद्रराजा तारामती । आवडी कौशिकें धरूनी हातीं;
मातृजनकाचिये पंक्तीं । रोहिदासा बैसविलें ॥ १९

त्रिवर्ग बैसवूनी निकटीं । मूर्ध्नीं कवळोनी धरिलीं पोटीं;
सुधाकरें थापटी पाठी । धरुनी हनुवटी सप्रेमें. ॥ २०
निज तपाच्या मौक्तिकें । तिघां शेस भरी कौतुकें;
जय जयकारें सृष्टिजनकें । हर्षे टाळी पिटिली ॥ २१
'राजा, कुमर, कांता, तिन्ही' । विबुध म्हणती, 'स्वर्गभुवनीं
विमानीं वाहुनीं नेऊं' तंव मुनीं । म्हणे, 'ऐका देव! हो! ॥ २२
स्वर्गसुखाची अचळ फळें । अंचळीं बांधिलीं तपोबळें
परी शरीरदु:खाच्या अनळें । देह जालें जर्जर ॥ २३
राजहानीची काळिमा । लागलीसे मज उत्तमा
ते क्षाळुनी स्वर्गधामा । आरूढवीन ययांतें ॥ २४
उमा रमा सावित्री सती । लोपामुद्रा अरुंधती
आपुलीं पुण्यें तारामती- । प्रति वोपिती चोळिया ॥ २५
विमानीं आरुढोनी सुरवर । गेले, करुनी जयजयकार
तिघां घेऊनि ऋषीश्वर । निघता झाला अयोध्ये. ॥ २६
वीरबाहू येउनी पुढें । नृपा हांकी तोलोनि दंडें
'माझ्या दूता नेतां, तोंडें । हाणोनि फोडीन सर्वथा' ॥ २७
जाणोनि अंत्यजाची अटक । पातला देवर्षिनायक
म्हणे, 'हा सवित्याचा बाळक । ऋषिशापें अंत्यज ॥ २८
पातली शापपरिहारवेळा । याशागीं धाविन्नला उतावळा
मुक्त करुनी प्रेतपाळा । बोळवावें स्वधामा.' ॥ २९
नारदवचनें गाधिज मुनी । दिव्यदेही दंडपाणी
करूनि, वैसवी विमानीं । तपाचिया सामर्थ्यें. ॥ ३०
निमिष न लागतां सत्वर । नृप, कांता, सहितकुमर
तिघां घेउनी ऋषीश्वर । अयोध्यापुरीं पातला. ॥ ३१

# ४.

# वामन.

—*—

## सीतास्वयंवर.

रायें विवाहास मुहूर्त केला
लागे हरिद्रा नृपकन्यकेला ॥
सुवासिनींच्या करपुष्करांनीं
सुरत्नकुंभांकरपुष्करांनीं; ॥ १

चहूंही मोक्षांचे कलश चहुंकोनीं मिरवती;
न जे ब्रम्हीं हेमीं दिसातिहि खरेसे म्हणविती; ।
गुणीं शुभ्रीं दावी सगुण.पण संतांस सुमती
असें न्हाणें वारी अभिनव वधू शांति सुमती ॥ २

चढे तीस सर्वात्मतेची हरिद्रा
न जे ठाउकी भेदवाद्या दरिद्रा ।
तिचें शेष ये षड्गुणा रामचंद्रा
अविद्याग्निसंतप्तविश्रामचंद्रा ॥ ३

एक राम जनिं देवदेव कीं
भाव हा उभय देवदेवकीं ।
जाह्नवी पुरवि काम कामना
वापिकाखननकाम का मना ॥ ४

जीव जे प्रकृतिअष्टकवर्गीं
तृप्त ते सकळ अष्टकवर्गीं ।

ज्योतिषी द्विज पुरोहित सारे
त्यांत एकहि न मोहितसा रे॥ ५
गुणत्रयांच्या तटिनीप्रवाहीं
सत्वांबु शोधूनि पृथक् विवाहीं।
ते घालिती काळघडी द्विजाती
सत्यें घड्या रामनिमित्त जाती॥ ६
वाजवीत विविधा निगमातें
घे नृप श्रुतिचिया उगमातें।
आणिला निजगृहा नवरा हो
'जो मनीं' म्हणति मानव 'राहो.'॥ ७
पूजूनि राम निगमोदित बोधरीती,
चित्तंतु आड पट मायिक जो धरीती,।
काढावयासिच निषेधुनि घेत हातीं,
शांतीसि अन्तराहि हेंचि असें पहाती॥ ८॥
श्रीराममंगळकथा जन गात नाना;
अध्यात्ममार्ग बघतांचि वृथा तनाना।
न भ्रांतिचा पट फिटे म्हणुनी, द्विजाती
गाती सुमंगळ सुधारस चित्र-जाती॥ ९
ब्रह्मा वृद्ध, सकाम, काम-रिपु तो, रुद्र स्मशानीं वसे
दैत्यत्रस्त सुरेंद्र; इंद्रगुरुही इंद्राभिमानी असे।
दुर्वासादि अशान्त, शांत मजही जो कांत इच्छीच ना
माळा हे कमळा, विचारुनि, गळां घाली जगज्जीवना॥ १०

' इच्छीना मजला सुरासुर भला ऐसा दिसेना मला, '
आशेशीं रमला जिच्या नर, तिला तो दाससा भासला ।
श्रीवांछादि मला शिवे न, शमला, त्या या घनश्यामला
माळा हे कमळा, विचारुनि, गळां घाली जगन्मंगला ॥ ११

श्रीमद्भागवतांत, आणि इतर ग्रंथीं, महाभारतीं
श्रीमद्रामकथा निरूपित, बरी व्यासाचिही भारती ।
गाती तेचि शुकादि गोत्रज कुळीं मध्यें वसिष्ठान्वयीं
माझा वामन राम गाइल तया लक्षूनि सर्वान्वयीं ॥ १२
' पौरोहित्यहि निंद्य, तें विधि-पिता दे या कुळाचें मला
या संबंध-मिषेंचि लाधसि ' म्हणे ' रामा! घनश्यामला! ' ।
तो मी आजि पुरोहितत्व करितों, वैवाहिकें मंगळें
गातों रामरसें, कृतार्थहि असें केलें जगन्मंगळें ॥ १३
विश्वामित्र म्हणे, ' पवित्र चरणें माझ्या करीं आश्रमा
संगें ये मिथिलेसि, पाद-कमलें नाशीं अहल्या-श्रमा ।
मद्वाक्यें भव-चाप-भंग करितां माला रमा कंधरीं
घाली, आजि विवाह-मंगळ-दिनीं सीतेसि हातीं धरीं.' ॥ १४

सीतास्वयंवर.

---

## ५

# मोरोपंत.

( शके १६५१–१७१६. )

### १. प्रारब्ध–भोग.

प्रद्युम्नादिक एकदां उपवनीं क्रीडोनिया भागले
तान्हेले यदुवीर नीर मग ते शोधावया लागले ।
तों निर्जीवन कूप त्यांत सरडा गुंतोनियां राहिला
सु–स्थूळाकृति तो अपूर्वचि तिहीं कौतूहळें पाहिला ॥ १
प्रद्युम्नादिक ते कुमार सदय ख्यात स्वयें विक्रमी
त्याच्या उद्धरणीं प्रयत्न करुनी झाले समस्त श्रमी ।
दीनोद्धार–पटुप्रभूप्रति महाश्चर्यें तदा सांगती
काढी वामकरें तया सहज, दे जो देव दासां गती ॥ २
पतितोद्धरणीं झाले भग्न-संकल्प बाळक ।
प्रार्थितां उद्धरी त्यातें लीळेनें विश्वपाळक ॥ ३
तो दिव्याकृति विश्व–पावन–कर–स्पर्श–क्षणीं होय, जें
पीयूषें न दिजे, दिजे सहज त्या पद्मालया–तोयजें ।
त्याचें वृत्त पुसे समस्त विभु संकल्पें चि जो नैक वी
ब्रह्मांडें, हृदयस्थ, काय न कळे त्यातें ? जनां ऐकवी ॥ ४
तो सांगे सर्व वृत्त प्रभुस निजमुखें जोडुनी भूप हात
श्रीमत्पादांबुजाचा नख–मणि–किरणीं स्पर्शिली भू पहात ।

"तो मी ईक्ष्वाकुराजेश्वर–सुत नृग जो स्पर्शतो काय कानीं ?
आधीं गातां वदान्योत्तम–नृपति–यशें सज्जनीं गायकांनीं ॥ ५
आज्ञा सर्वेश्वराची म्हणुनि निजमुखें सांगतों वृत्त सर्व,
स्वामी ! आम्ही कुलीन प्रगट, न शिवला स्वप्नकाळीं हि गर्व; ।
तूं तो भूतात्म–साक्षी, तुज विदित नसे काय बा ! यत्युपास्या ?
दास्याचा लाभ आहे निजगुणकथनामाजि ही या मदास्या ॥ ६
होतों पूर्वजरीति–नीति–वश मी साधुप्रिया ! या च कीं
कीर्ति–श्रीखनि ! चित्त वित्त हरिलें माझें सदा याचकीं; ।
आधीं मन्मतिला जनस्मृति दयासंयुक्त यावि, प्रजा—
शब्दें लागति गोड, सांगति कथा दासासि सद्विप्र ज्या ॥ ७
सत्पात्रीं साधु–काळीं स–विधि स–विनयें सादरें म्यां सदिष्टें
गो–दानें न्याय–लब्धें सकळ–शुभ–गुणें अर्पिलीं बा ! सदिष्टें ।
तत्संख्या स्थूळमानें करुनि जितकिया केशवा ! वृष्टिधारा
कीं भूनद्यब्धिमध्यें असतिल सिकता कीं नभामाजि तारा ॥ ८
भूवस्त्राऽन्नेभ–शय्या–तिळ–रजतगृह–स्वर्ण–रत्नादि–दानें,
इष्टा–पूर्तें हि केलीं सकळ निजमनःशुद्धिचीं जीं निदानें; ।
या मार्गीं वर्ततां जें मजवरि पडलें संकट, श्री–धवा ! तें
ऐकावें त्वां स्व–नाम–स्मरण–परजन–क्लेश–पाथोद–वातें ॥ ९
कोणा एका द्विजाची यदुपति ! चुकली धेनु, मद्गोधनीं ती
आली, म्यां ब्राह्मणातें न कळत दिधली, राहिली शोध–नीती; ।
नेतां भेटे पथांत प्रथम–पति तिचा ओळखे आपलीला,
'माझी माझी च' दोघे ह्मणत ह्मणत ते सिद्ध झाले कलीला ॥ १०

म्हणे स्वामी, ‘ विप्रोत्तम दिससि, कां पाप करिसी ?
कसा ब्रह्मस्वातें निरयगतिलाभार्थ वरिसी ? ’ ।
प्रतिग्राही बोले, ‘ निरय अनृतें सत्य, नृग या
धना दे, धर्मात्मा नृप परि करी जो न मृगया ’ ॥ ११

आले दोघे हि विप्र—प्रवर मजकडे शीघ्र घेऊनि गाय,
क्रोधें दुःप्रेक्ष्य त्यांचे रविपरिस मला भासले उग्र काय; ।
त्यांचे म्यां स्वासनास त्यजुनि निजशिरीं वंदिले तप्त पाय,
प्रार्थूनि क्ष्मा—सुरांतें सविनय वदलों,‘या,बसा,कार्य काय?’॥ १२

केला ज्या मुनिनें प्रतिग्रह म्हणे तो, ‘ त्वां दिली गाय, कीं,
गावी कीर्ति तुझी पयोधि—लहरि—स्वच्छा भली गायकीं ’।
गो—स्वामी हि मला म्हणे, ‘ बहु भला, हा धर्म कीं गौरव
ब्रह्मस्वाऽपहरा नृगा ! तुज चि दे ? अन्यासि तो रौरव? ’॥ १३

जैं कोपले ब्राह्मण ते, अधीत मी
भ्यालों, बुडालीच मुहूर्त धी तमीं; ।
म्यां प्रार्थिलें कीं, ‘ घडला प्रमाद, या
दासीं करा जि ! प्रभुजि ! क्षमा दया ॥
कृपा करा जी ! यश होइल, क्षमी
तुम्ही पिता माय हि धेनु लक्ष मीं, ।
समर्पितों पाय धरून, कोप हा
सुदुःसह, क्षोभ करूं नको, पहा. ’ ॥ १४

गोस्वामी द्विज आयके जइं असा हा मंद बोल, क्षती
तेजाची समजे, म्हणे, ‘ मज नको, अन्या असे लक्ष, तीं ।

दा. क्र. ३७५५

माझी गाय मला न देसि, तरि मी जातों, नृगा ! आपला
रक्षावा कुळधर्म ' बोलुनि असें गेला चि संतापला ॥ १५

प्रतिग्राही बोले, ' नमुनि मज लक्षा हि उपरी
ज-ही देसी गायी अयुत दुसऱ्या ही बहु परी. ।
नको, राहो हे हि श्रुतिसुरभि टाकूनि, पशुची
स्पृहा केली, हें चि प्रथम घडलें कर्म अशुचि. ' ॥ १६

गेले दोघे हि धेनु त्यजुनि, मग तनुत्याग हा म्यां हि केला,
यांम्यांनीं दोषरंध्रीं धरुनि यमसभेलागिं हा दास नेला; ।
देवा ! तेव्हां यमानें अभिमत पुशिलें कीं, ' नृगा ! सांग बापा !
आधीं तूं भोगितोसि स्वसुकृत, अथवा भोगिसि स्वल्प पापा?' ॥ १७

' ठावें पुण्य उदंड, अल्प अघ, हें ताटीं जसा पापड;
आधीं भोगिन मी ' म्हणें, यम म्हणे मातें ' रसापा ! पड ' ।
तों झालों कृकलास दास गतिला या पावलों ही नता,
दात्या ब्राह्मणपूजका ! स्मृति तुझी होती जऱ्ही हीनता ॥ १८

उदंड जऱ्हि जोडिलें सुकृत तें किती ? दर्शन
प्रभो ! मज तुझें असें कर—सरोरुह—स्पर्शन ।
अहो ! गिरिधरा ! खरा सदय तूं हरा सामरा,
सुदुर्लभ, परात्परा ! सुलभ या नरा पामरा. ॥ १९

प्रभो ! तवपदांबुजीं मधुप जे सदा लोळते,
जना निवविति क्षणें सुख—सुधाब्धि—कल्लोळ ते ।
स्वनाम कमळें, मुनि भ्रमर ज्यांत, नाशी, तळें
तुझें यश चि, ताप, जें हरि रसें मना शीतळें ॥ २०

प्रणाम तुजकारणें प्रणत–वत्सला ! पावना !
भवत्पद–सरोरुह–स्मृति असो जगद्भावना ! ।
पदाब्ज–युगळी तुझी सुरभि, मानसा वांसरा
नसो विरह, नीरजासह जसा नसावा सरां ॥ २१
आज्ञा घेउनि, वंदुनि प्रभुसि, तो स्वर्गासि गेला नृग,
गंधर्वीं विभुकीर्तिगानसुरसीं मोहूनि नेला मृग; ।
ब्रह्मस्वाग्निकणें जळे कुळयशःकर्पूर, हें विस्तरें
सांगे कृष्ण यदूंसि, कीं, न इतरें तीं संकटें दुस्तरें ॥ २२

कृष्ण–विजय.

---

## २. स्फुट केका.

श्रीरामा ! तूं स्वामी अससी माझ्या शिरावरी जागा;
आम्हांसि तुज्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा ॥ १
आतां प्रभो ! दयाळा ! मज दीनावरि करूनियां करुणा
स्व-पदाब्जीं मन्मानस-भृंग रमो उगउं दे कृपा-अरुणा ॥ २
केवळ भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि तरि नसे थारा
आपलिया थोरपणावरि ठेउनि दृष्टि दीन हा तारा ॥ ३
धांव समर्था ! सदया ! भव–पंकामाजिं बुडतसे गाय !
निकटस्था ! धर्मज्ञा ! कौतुक अद्यापि पाहसी काय ? ॥ ४
दंडकवन खळ मर्दुनि निर्भय केलें जसें प्रतापानें,
गतभय हा शीघ्र करी, जाला बहु विकळ विप्र तापानें ॥ ५

नांव तुजें नावाचि या संसारांभोधिला तरायासी,
तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी ? ॥ ६
अन्याय लेश नसतां गांजिति उद्वृत्त हें तुलाचि कळो;
किकळोनि सांगतों तुज या दुःखें न मन आमचें विकळो ॥ ७
सिंहा समक्ष त्याच्या बाळाला जाचितील जरि कोले
तरि मग अशास पंचानन मृगपति कोण जाणता बोले ! ॥ ८
त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा हे पापिणी धरून गळा
हे ताटकांतका ! हा परमार्थ इणेंचि बुडविला सगळा ॥ ९
केलें म्यां मनुजांचें आर्जव बहु चाटुकारही जालों,
परि तेथ ताप पावुनि पुनरपि तुजलागिं शरण मी आलों ॥ १०
प्रभुजी ! तुमचें सज्जन उदारपण वर्णितात बहुसाल,
सालसता मत्राणीं धरितां, शब्दांत सर्व गवसाल ॥ ११
ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीर धीर भर्ता तूं;
जनपीडा हर्ता तूं, श्रीरामा ! मुख्य विश्वकर्ता तूं ॥ १२
ब्राह्मण–रक्षण–सक्षण दक्षिण अक्षीण–सद्यशो–धाम,
जलद-श्यामल कोमल कलि-मल-हर हर-मनोज्ञ रघुराम ॥ १३
सुरवर मुनिवर नृपवर नुतगुणगण वरद परमसुखसदन
त्रिभुवन-समवन-पटु-भुज भव-दव-भय-शमन रुचिरतर-वदन ॥ १४
ऐसें गायिन तुजला, हा माजा काम पूरवी वरदा
हरदासाचें संकट रामा ! भवसिंधुमग्नजनकरदा ॥ १५
मज भणगाला वरदा ! वर जरि करुणा करूनि देशील
तरि मानवती सज्जन–मनें जयाला असोचि दे शील ॥ १६

शर्व–प्रिय–सच्चरिता ! सर्व जगत्पालका ! अगा बापा !
पर्व-सुधा-कर-कर-रुचि-गर्व-हर-स्मित-मुखा! हरी तापा ॥ १७
नानाभयें विलोकुनि पावतसे फार फार तनु कंपा;
शिर ठेविलें पदांवरि, उशिर न लावी, करीच अनुकंपा॥ १८
बहुसंख्य चपळ मर्कटकटकें आज्ञेंत वर्तलीं नीट;
वीट न धराशिल तरी माझें मन काय तुजपुढें धीट ? ॥ १९
दे अभयदान देवा ! सेवारत मी तुजा विभो ! भाट;
त्यजितां अनादरानें करीन लोकांत फार बोभाट; ॥ २०
स्तुति करुनि तुजी तुजला आम्ही अज्ञान काय बा ! रिझवूं ?
गावुनि अमृतगुणातें हृदयींचे ताप आपले विझवूं ॥ २१
जेथ तुम्ही तेथुनि मज पहा कृपामृतरसार्द्रदृष्टीनें,
हत निर्मितसृष्टीनें शरणागतमरुद्युधौघवृष्टीनें ॥ २२
संतांसि तरी प्रेरा, जडतारक ते तुम्हांहुनीं न उणे,
मूर्ती बहु सदयहृदय, पावविती सहज अखिल आत्मखुणे ॥ २३
संत भगवंत साचे, परि भगवंतापरीस हे थोर,
हे आंगें अंधाची यष्टी होताति थोर बहु थोर ॥ २४
ऐसे भगवत्तत्पर सदयहृदय संत पंत भेटावे,
ते सच्छिक्षादाते मुमुक्षुबुद्धीसि होति नेटावे ॥ २५
तूं सज्जनशुकपंजर कंजरमणवंशमणि वतंसपद
खळशमन बळशमनशरकर हरहर हरहृदयहर विरक्तपद ॥ २६
भक्तमयूरदयाघन तूं राम ! भवदवार्तविश्रामा !
साष्टांग नमन तुजला भुजलालितनिजजना गुणग्रामा ! ॥ २७

आर्या केकावली.

# भाग दुसरा.

## ६.

# ज्ञानेश्वर.

( शके ११९७-१२१८. )

## १ अमानित्व.

तरी कवणेंही विषयींचें । साम्य होणें न रुचे
संभावितपणाचें । वोझें जया ॥ १
आथिलेचि गुण वानितां । मान्यपणें मानितां
योग्यतेचें येतां । रूप आंगा ॥ २
तैं गजबजो लागे कैसा । व्याधें रुंधला मृगु जैसा
कां बाही तरतां वळसा । दाटला जेवीं ॥ ३
पार्था तेणें पाडें । सन्मानें जो सांकडें
गरिमेतें आंगाकडे । येवोंचि नेदी ॥ ४
पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी
हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ॥ ५
तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा देईल भेटी
मरणेंसीं साटी । नमस्कारितां ॥ ६
वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे
परि वेडिवेमाजि दडे । महिमे येणें ॥ ७

चातुर्य लपवी । महत्व हारवी
पिसेपण मिरवी । आवडोनी ॥ ८
लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रांवरी उबगु
उगेपणीं चांगु । आथी भरु ॥ ९
जगें अवज्ञाचि करावी । संबंधीं सोयचि न धरावी
ऐसी ऐसी जीवीं । चाड बहु ॥ १०
तळवटपण बाणे । आंगीं हिणावो खवण
तें तेंचि करणें । बहुतकरूनी ॥ ११
हा जीतु ना नोहे । लोक कल्पी येणें भावें
तस जिणें होआवें । ऐसी आशा ॥ १२
पैं चालतु कां नोहे । कीं वारेनि जातु आहे
जना ऐसा भ्रमु जाये । तैसें होईजे ॥ १३
माझें असतेंपण लोपो । नामरूप हारपो
मज झणें वासिपों । भूत-जात ॥ १४
ऐसी जयाचीं नवासियें । जो नित्य एकांता जातु जाये
नामेंचि जो जिये । विजनाचेनि ॥ १५
वायू आणि तया पडे । गगनेसीं बोलों आवडे
जीवें प्राणें झाडें । पडियंतीं जया ॥ १६
किंबहुना ऐसीं । चिन्हें जया देखसी
जाण तया ज्ञानेंसीं । शेज जाहली ॥ १७

पैं अमानित्व पुरुषीं । तें जाणावें इहीं मिषीं ॥

———

## २ क्षमा.

पार्था तेणें पाडें । क्षमा जयातें वाढें
तेही लक्षे तें फुडें । लक्षण सांगो ॥ १

तरि पडियंतें लेणें । आंगीं भावें जेणें
धरिजे तेविं साहणें । सर्वाचि जया ॥ २

त्रिविध मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे
वरि पडिलिया नव्हे । वांकुडा जो ॥ ३

अपेक्षित पावे । तें जेणें तोषें मानावें
अनपेक्षिताही करवे । मानु तोचि ॥ ४

जो मानापमानातें साहे । सुखदुःख जेथ सामाये
निंदास्तुती नोहे । दुखंडु जो ॥ ५

उन्हाळेनि जो न तपे । हिमवंतीं न कांपे
कायसेनिही न वासिपे । पातलेया ॥ ६

स्वशिखरांचा भारु । नेणें जैसा मेरु
कीं धरा यज्ञ–सूकरु । वोझें न म्हणे ॥ ७

नाना चराचरीं भूतीं । दाटणीं नव्हे क्षिती
तैसा नानाद्वंद्वीं प्राप्ती । घामेजेना ॥ ८

घेऊनी जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट
करी वाड पोट । समुद्र जेवीं ॥ ९

तैसें जयाचिया ठायीं । न साहणें कांहींचि नाहीं
आणि साहतु असें ऐसेंही । स्मरण नुरे ॥ १०

आंगा जे पातलें । तें करूनि घालें आपुलें
तेथ साहतेनि नवलें । घेपिजेना ॥ ११

हे अनाक्रोश क्षमा । जयापाशीं प्रियोत्तमा
जाण तेणें महिमा । ज्ञानासि गा ॥ १२

( ज्ञानेश्वरी-अ. १३ वा.)

७.

# एकनाथ.

( शके १४७०-१५३१. )

## संतांचीं लक्षणें.

कृपेसी स्वतंत्र जन्म नाहीं । येथ उपजे तो साधु पाही
कृपा वसे संतांच्या देहीं । त्याचेनि ते पाहीं दाटुगी जगीं ॥२७

कृपा भूतमात्राच्या ठायीं । सारिखीच सर्व देहीं
येथतेथ हें त्या नाहीं । अवकृपा ठायीं निमाली ॥ २८

दुःख हरोनि सुख देत । नवल कृपाळुत्वाचें चित्त
जीवाचा जीव जेवीं सुत । कृपा अद्भुत तया परी ॥ २९

जेणें आपणासी होय दुःख । तें परासि न करी निःशेख
जण आपणिया होय सुख । तें करी अवश्यक प्राणिमात्रां॥८३०

या नांव कृपाळुता । हें पहिलें लक्षण संतां
दुसरें तें अद्रोहता । ऐक आतां सांगेन ॥ ३१
लोकीं हिंडतां अद्रोहता । ठावो न लभेचि सर्वथा
मग शरण आला साधूसंतां । सावकाशता वस्तीसी ॥ ३२
ते दयाळु शरणागता । तिहीं तिहीं प्रतिपाळिली अद्रोहता
भूता भगवंत देखतां । द्रोहाची वार्ता निमाली ॥ ३३
व्याघ्र सर्पादि देहांसी । कदां द्वेष नुपजे त्यांसी
जरी देऊं आले उपद्रवाशीं । तरी द्वेषासी करीना ॥ ३४
देहास आली आपदा । तेणें सांडी करी प्रारब्धा ।
द्वेष येऊं नेदी कदां । नातळे क्रोधा निज बळें ॥ ३५
हे जाणपां अद्रोहता । तिसरें लक्षण तत्वतां
तितिक्षा ते ऐक आतां । सहनशीलता साधूंशीं ॥ ३६
शांति परदेशीं झाली होती । जेथें जाये तो दवडी परती
मग अति दीन येतां काकुळती । निजधामा संतीं आणिली ॥ ३७
संतीं वाढविली अतिप्रीती । तें भगवंतासि झाली पढियंती
तेणें आपुली निज संपत्ती । शांतीच्या हातीं दीधली ॥ ३८
शांती सकळ वैभवेंसीं । अखंड असे संतांपाशीं
यालागीं सहनशीलता तयांसी । अहर्निशीं अनिवार ॥ ३९
हिंडतां सकळ भूतीं सैराटा । न म्हणे हा भला वोखटा
नाचत निजशांतीचे चोहटा । संत गोमटा त्या नांव ॥ ४०
ऐसी जे सहनशीलता । ते तितिक्षा जाण तत्वतां
हें तिसरी लक्षणता । सत्याची सत्यता अवधारी ॥ ४१
सत्य अल्पायुषी झालें येथें । मरे उपजे तें तेथिच्या तेथें ।
कोठें कांहीं नव्हेंचि वाढतें । तेणें सत्यातें टाकिलें ॥ ४२

सत्यासी संतांसी होतां भेटी । तंव सत्यस्वरूपीं पडली गांठी
सत्य सदसत्यें उठी । झालें सृष्टीं चिरायु ॥ ४३
यापरी सत्य संतदृष्टीं । सत्य सारें आलें पुष्टीं
संतबळें वाढलें सृष्टीं । सत्यें भेटी परब्रह्मीं ॥ ४४
संतांसि व्हावया उतरायी । सत्य लागलें त्यांचे पायीं
संत वेगळा पाही । थारा नाहीं सत्यासी ॥ ४५
ऐसें सत्यास आधारभूत । ज्यांचे पाखोवा सत्यजीत
ज्यांचेनि बळें सत्य समर्थ । ते शुद्ध संत जाणावे ॥ ४६
ज्यांसि सबाह्य सत्यत्वें तुष्टी । जे सत्यस्वरूपें आले पुष्टी
सत्यें घाली दे ढेंकरदृष्टी । ज्यांची वाचा उठी सत्यत्वें ॥ ४७
या नांव जाण सत्याचें सार । हें संतांचें वसतें घर
हे मज मान्य संत साचार । मी निरंतर त्यांपाशीं ॥ ४८
जिहीं सत्याची वाहुनी आण । ज्यांमाजीं सत्य प्राण
जे सदा सत्यत्वें संपन्न । हें मुख्य लक्षण साधूचें ॥ ४९
या नांव सत्यसार । संत लक्षण साचार
हा चौथा गुण सधर । अनवद्य असार तें ऐक॥ ५०
निंदा असूयादि दोष समस्त । निजात्मबोधें प्रक्षाळित
अत्यंत निर्मळ केलें चित्त । अनिंदित निजबोधें ॥ ५१
गुरुआज्ञा तीर्थीं न्हाला । न्हावोनि सर्वांगीं निवाला
त्रिविध तापें सांडवला। पवित्र झाला मद्रूपें ॥ ५२
काय सांगूं त्याची पवित्रता । तीर्थें मागती चरणतीर्था
मीही पदरज वांछिता । इतरांची कथा कायसी? ॥ ५३

(एकनाथी-भागवत. अ. ११ वा.)

## ८.

# श्रीसमर्थ रामदास.

### ( शके १५२७–१५९९. )

## १ चातुर्यलक्षण.

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहज गुणास न चले उपाये
कांहीं तरी धरावी सोये । आगंतुक गुणाची ॥ १
काळें माणूस गोरें होईना । वोढाळास यत्न चालेना
मुक्यास वाचा फुटेना । हा सहज गुण ॥ २
आंधळें डोळस होईना । बधिर तें ऐकेना
पांगुळ पाय घेईना । कांहीं केल्या ॥ ३
कुरूपतेचा लक्षण । किती म्हणोन सांगणें
रूप लावण्य या कारणें । पालटेना ॥ ४
अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती
कुविद्या सांडूनि अभ्यासिती । शाहणे विद्या ॥ ५
मूर्खपण सांडितां जातें । शाहणपण शिकतां येतें
कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ६
ऐसी प्रचीत येते मना । तरी स्वहित का कराना
सन्मार्गें चालतां जाणा । सज्जना माने ॥ ७
मान्यता आवड जीवीं । तरी उपेक्षा कां करावी
चातुर्येंविण उंच पदवी । कदापि नाहीं ॥ ८

अन्तर्कळा शृंगारावी । नाना परी उमजावी
संपदा मेळवून भोगावी । सावकाश ॥ ९

देह नेटकें शृंगारिलें । परी तें चातुर्येंविण नासलें
गुणेंविण साजिरें केलें । बाष्कळ जैसें ॥ १०

यत्न करीना ना शिकेना । शरीर तेंहि कष्टवीना
उत्तम गुण घेईना । सदा कोपी ॥ ११

आपण दुसरियास करावें । तेणें सर्वेंचि उसणें घावें
जना कष्टवितां कष्टावें । लागेल बहु ॥ १२

न्यायें वर्तेल तो शाहणा । अन्यायी तो दैन्यवाणा
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ १३

जें बहुतांस मानलें । तें बहुतीं मान्य केलें
येर तें व्यर्थचि गेलें । जगनिंद्य ॥ १४

लोकीं आपणास बोलावें । किंवा अवघेंचि कोसळावें
आपणासि समाधान फावे । ऐसें करावें ॥ १५

समाधानानें समाधान वाढे । मैत्रीनें मैत्री जडे
मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेंपण ॥ १६

अहो कांहो अरे कां रे । जनीं ऐकिजे कीं रे
कळत असतांच कां रे । रिकामीपण ॥ १७

चातुर्यें शृंगारे अन्तर । वस्त्रें शृंगारे शरीर
दोहींमध्यें कोण सार । बरें पहा ! ॥ १८

बाह्यात्कारें शृंगारिलें । तेणें लोकांच्या हातास काय आलें !
चातुर्यें बहुतां संरक्षिलें । नाना परी ॥ १९

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें
समस्तांस बरें म्हणावें । ऐसें वाटे ॥ २०
तनें मनें झिजावें । तेणें भलें म्हणोन घ्यावें
उगोंचि कल्पितां सिणावें । वाउगें जनीं ॥ २१
लौकिकीं कार्यभाग आवडे । तो कार्यभाग जेथें घडे
लोक सहजाचि वोढे । कामासाठीं ॥ २२
म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें
दुसऱ्यास कष्टवितां । कष्टावें लागेल स्वयें ॥ २३
हें तो प्रगटाचि आहे । पाहिल्याविण कामा नये
समजणें हाचि उपाये । सर्वत्रांसी ॥ २४
समजले आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष झाले
या वेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ २५
जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव
समजला तरि उपाव । प्रगटाचि आहे ॥ २६
आळसें कार्यभाग नासतो । साक्षेपें होत होत होतो
दिसते गोष्टी कळेना तो । शाहणा कैसा ॥ २७
मैत्री करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्यू
बोलिलें हें सत्य कीं असत्य । ओळखावें ॥ २८
आपणास शहाणे करूं नेणें । आपलें हित आपण नेणे
जनीं मैत्रिकी राखों नेणें । वैर करी ॥ २९
ऐसे प्रकारींचे जन । त्यांस म्हणावें अज्ञान
तयांपाशीं समाधान । कोण पावे ॥ ३०

आपण एकाकी एकला । सृष्टींत भांडत चालिला
बहुतांमध्यें एकल्याला । यश कैचें ॥ ३१
बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अन्तरीं भरावें
उत्तम गुणीं विवरावें । प्राणिमात्रांसी ॥ ३२
शहाणे करावे जन । पतित करावे पावन
सृष्टिमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ ३३

दासबोध. ( द. च. )

---

## २ पराधीन पंचक.

१

मुंगसाचे कानीं बाळीं । मुंगुस हिंडे आळो आळीं ॥ १
तरि तें पाळिलें जाणावें । पराधीनाचि स्वभावें ॥ २
वेडें आलेंसे पाहुणें । तरि ते जगाचें मेहुणे ॥ ३
कायकर्ता कीर्तिवंत । त्यासी जाणती समस्त ॥ ४
कार्य कर्ता तो झाकेना । वेध लावी विश्वजना ॥ ५
दास म्हणे कुटुंबाचा । तोचि पुरुष देवाचा ॥ ६

२

निज सलगींचें जाणेना । पुढें कोणासी मानेना ॥ १
आळसी निकामा माणुस । पुढें होत कासावीस ॥ २
उगेंच नाचतें मुरडतें । कोण पूसतें तयातें॥ ३
आपणांस अवकाळिलें । ज्याचें त्यास कळों आलें ॥ ४

झालीं कृशाश्व मुनिला त्यापासुनि कौशिकाकडे गेलीं
त्याच्याच संप्रदायें श्रीरघुनाथांकडेस तीं आलीं ॥ १४

**चंद्रकेतु**—कोणी असें म्हणतात कीं, ज्याच्यामध्यें सत्वगुणाचा विशेष आविर्भाव असतो, असे जे कोणी मंत्रद्रष्टे त्यांस स्वतःसिद्धही उपलब्ध होतात.

**सुमंत्र**—( डोळ्यांत अश्रु आणून ) वत्सा चंद्रकेतो, तो वीर माघारा इकडे परतला पहा! सावध ऐस.

( चंद्रकेतु आणि लव हे दोघे दुरून एकमेकांस उद्देशून मनांत म्हणतात ) या कुमाराकडे पाहून किती तरी आनंद होतो हा?

( स्नेहानें आणि प्रीतीनें एकमेकांकडे निरखून पाहतात. )

सहजगत्या संवाद काय झाला
कीं गुणांचा अतिशयाचि फळा आला ॥ १५

अन्यजन्मीं संबंध निबिड होता
यामुळें हा परिचयचि सुदृढ आतां ॥ १६

जन्मकाळींचा गूण कीं उदेला
दैवयोगें अवचीत योग झाला ॥ १७

हृदय माझें पाहून कुमारासी
सावधानें लागतें तया पाशीं ॥ १८

**सुमंत्र**—बहुतकरून प्राण्यांचा धर्मच आहे, कीं कोणाची कोणावर तरी विशेष प्रीति जडावी. याविषयीं लोकांत परस्पर ऋणानुबंध किंवा गणमैत्री अथवा चक्षु-राग असें म्हणतात. यालाच अबाधित आणि अहेतुक प्रेमा म्हणावें.

जो पक्षपात झाला निष्कारण त्यास कोण हो मोडी
कीं स्नेहतंतु अंतःकरणातें दृढ शिवोनियां जोडी ॥ १९

आपण एकाकी एकला । सृष्टींत भांडत चालिला  
बहुतांमध्यें एकल्याला । यश कैचें ॥ ३१  
बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अन्तरीं भरावें  
उत्तम गुणीं विवरावें । प्राणिमात्रांसी ॥ ३२  
शहाणे करावे जन । पतित करावे पावन  
सृष्टिमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥ ३३

दासबोध. ( द. च. )

---

## २ पराधीन पंचक.

१

मुंगसाचे कानीं बाळीं । मुंगुस हिंडे आळो आळीं ॥ १  
तरि तें पाळिलें जाणावें । पराधीनाचि स्वभावें ॥ २  
वेडें आलेंसे पाहुणें । तरि ते जगाचें मेहुणे ॥ ३  
कायकर्ता कीर्तिवंत । त्यासी जाणती समस्त ॥ ४  
कार्यकर्ता तो झाकेना । वेध लावी विश्वजना ॥ ५  
दास म्हणे कुटुंबाचा । तोचि पुरुष दैवाचा ॥ ६

२

निज सलगीचें जाणेना । पुढें कोणासी मानेना ॥ १  
आळसी निकामा माणुस । पुढें होत कासावीस ॥ २  
उगेंच नाचतें मुरडतें । कोण पूसतें तयातें ॥ ३  
आपणांस अवकाळिलें । ज्याचें त्यास कळों आलें ॥ ४

झालीं कृशाश्व मुनिला त्यापासुनि कौशिकाकडे गेलीं
त्याच्याच संप्रदायें श्रीरघुनाथांकडेस तीं आलीं ॥ १४

**चंद्रकेतु**—कोणी असें म्हणतात कीं, ज्याच्यामध्यें सत्वगुणाचा विशेष आविर्भाव असतो, असे जे कोणी मंत्रद्रष्टे त्यांस स्वतःसिद्धही उपलब्ध होतात.

**सुमंत्र**—( डोळ्यांत अश्रु आणून ) वत्सा चंद्रकेतो, तो वीर माघारा इकडे परतला पहा! सावध ऐस.

( चंद्रकेतु आणि लव हे दोघे दुरून एकमेकांस उद्देशून मनांत म्हणतात ) या कुमाराकडे पाहून किती तरी आनंद होतो हा?

( स्नेहानें आणि प्रीतीनें एकमेकांकडे निरखून पाहतात. )

सहजगत्या संवाद काय झाला
कीं गुणांचा अतिशयाचि फळा आला ॥ १५

अन्यजन्मीं संबंध निबिड होता
यामुळें हा परिचयचि सुदृढ आतां ॥ १६

जन्मकाळींचा गूण कीं उदेला
दैवयोगें अवचीत योग झाला ॥ १७

हृदय माझें पाहून कुमारासी
सावधानें लागतें तया पाशीं ॥ १८

**सुमंत्र**—बहुतकरून प्राण्यांचा धर्मच आहे, कीं कोणाची कोणावर तरी विशेष प्रीति जडावी. या विषयीं लोकांत परस्पर ऋणानुबंध किंवा गणमैत्री अथवा चक्षु-राग असें म्हणतात. यालाच अबाधित आणि अहेतुक प्रेमा म्हणावें.

जो पक्षपात झाला निष्कारण त्यास कोण हो मोडी
कीं स्नेहतंतु अंतःकरणातें दृढ शिवोनियां जोडी ॥ १९

**दोघेकुमार**—( एकमेकांस लक्षून म्हणतात ).

पाटांवापरि जें मृदू सुभग ही ऐशा शरीरावरी
टाकावे शर तीक्ष्ण केविं उपजे शंका मदभ्यंतरीं ।
भेटावे मिळतां जया लवकरी ऐसें मनी येतसे
यासाठी सहसा मदीय तनुही रोमांचिता होतसे ॥ २०

( किंचित् विचार करून )

कीं तेजस्वि वरा नरावर गती शस्त्राविणें कोणती
तीं शस्त्रें तरि काय होत? न अशा लक्ष्यास जीं पावतीं ।
मातें हाच म्हणेल काय फिरतां घेऊन शस्त्रें करीं
वीरांचा परिपाठ दारुण असा स्नेहास बाधा करी॥ २१

**सुमंत्र**—( लवाकडे निरखून पाहून हा सीतापुत्र असेल काय असें समजून डोळ्यांस पाणी आणून मनांत म्हणतो )

वेड्या हृदया, कशाला ही भलतीच कल्पना करतेंस !

बीजाचि मनोरथाचें नेलें दैवें हिरून दाटून
होतां विच्छिन्न लता पुष्पफळाशा उरेल कोठून ? ॥ २२

**चंद्रकेतु**—आर्या सुमंत्रा, मला वाटतें रथांतून खालीं उतरावें.

**सुमंत्र**—कशा करतां ?

**चंद्रकेतु**—येणेंकरून त्या वीर पुरुषाचा सन्मान केलासें होईल आणि क्षात्रधर्माचेंही पालन केलेसें होईल. कां कीं, रथीनें पादचाऱ्याशीं युद्ध करूं नये, अशी शास्त्रवेत्त्याची आज्ञा आहे.

**सुमंत्र**--( मनांत ) मला दोहोंकडून कसें संकट आलें पहा !

जें कर्म न्यायागत त्यातें आपण कसें निषेधावें
किंवा अनुमोदन तरि साहसकर्मास मी कसें द्यावें ? ॥२३

**चंद्रकेतु**–तुम्ही दशरथ महाराजांचे प्रिय मित्र; म्हणून, आमच्या वडिलांस धर्मार्थाविषयीं कांहीं संशय वाटतो तेव्हां ते तुम्हांसच विचारतात, आणि तुम्हीच त्यांची संशयनिवृत्ति करतां; असें असतां, या समयींच तुम्हांस इतका विचार कां पडला ?

**सुमंत्र**—हे चंद्रकेतो, तूं धर्मन्यायाच्या गोष्टी बोलतोस.

संग्रामांतील हा न्याय हाच धर्म सनातन
रघुवंशीय वीरांची वीरचर्या अशीच ही ॥ २४

**चंद्रकेतु**—हें तुमचें भाषण प्रतिरूप दिसतें; कारण कीं,

इतिहास पुराणातें धर्म तत्त्वपतिप्रती
तुम्हींच जाणतां वृद्ध रघूंची ही कुलस्थिती ॥ २५

**सुमंत्र**—( स्नेहाश्रु डोळयांत आणून चंद्रकेतूस आलिंगून म्हणतो.)

सुरपतिरिपुहंता जो तया त्वत्पित्याचें
वय तरि किति सांगू पाहतां अल्प त्याचें ।
समरचरित गोष्टी मूल त्याचें करीतें
दशरथकुल दैवें पावलें सुस्थितीतें ॥ २६

**चंद्रकेतु**—( कष्टी होऊन म्हणतो. )

नाहीं संतति रामा मग आम्हां असुन काय इतरांतें ।
हें दुःख सदा वाटे अमच्या दुसऱ्या तिघांहि पितयांतें ॥ २७

**सुमंत**—हरहर ! हीं चंद्रकेतूचीं भाषणें हृदयभेद करणारीं आहेत !

**लव**—आतां काय करावें ? अंतःकरणाचे भाव मिश्रित झाले.

इंदूदयीं कुमुदिनी जाशी हर्ष पावे
पाहून यास मम दृष्टि तशी सुखावे ।

बाहू पुन्हां फुरफुरे कलहा कराया
घाईच फार करितो धनुतें धराया ॥ २८

**चंद्रकेतु**--( रथावरून खालीं उतरलेसें करून) आर्या सुमंत्रा! हा मी सूर्यवंशोद्भव चंद्रकेतु तुला वंदन करितों.

**सुमंत**--( आशीर्वाद देतो.)

काकुत्स्थापरि तुमचा अरिवरि घालू प्रताप पल्याण
देवो सदा तुम्हांतें शाश्वत वाराह देव कल्याण ॥ २९

आणखी—

देऊ तो सविता तुला जय रणीं जो त्वत्कुलाचा पिता
आनंदास वसिष्ठही कुलगुरु जो धर्म संगोपिता ।
इंद्राग्न्यादिक देवताहि अपुलीं देऊत तेजें तुला
आशी देतिल रामलक्ष्मण निजानंदाचिया हेतुला ॥ ३०

**लव**-हे राजकुमारा! पुरे पुरे, अति आदर कशास पाहिजे? रथावर होतास तोच बरा दिसत होतास.

**चंद्रके०**—तर मग त्वांही दुसऱ्या रथावर बसावें.

**लव**--आर्या, राजपुत्राला पुन्हा रथावर बशीव.

**सुमंत**— आमचा चंद्रकेतु म्हणतो, तें त्वांही मान्य करावें.

**लव**—आपल्या वस्तु आपण स्वीकारण्याविषयीं विचार कशाचा? परंतु आम्ही सदा अरण्यांत राहणारे; रथावर बसण्याच्या कामांत केवळ अनभ्यस्त आहों. हें तुम्हांसच योग्य.

**चंद्रकेतु**--मुला, क्रूरपणा आणि सुजनपणा या दोहोंची क्रिया तूं बरीच जाणतोस! अशा तुला इक्ष्वाकुवंशोद्भव राजा रामचंद्र जर पाहता, तर त्याचें हृदय स्नेहानें पाझरले असत.

**लव**--मलाही असेंच वाटतें. तो राजर्षि फार सुजन आहे असें ऐकतों.
( लज्जित झाल्या सारखें करून )

३७५५

आम्ही तरी न करुं मत्सर त्या मखातें
राजा गुणी न बहु मानिल कोण त्यातें ।
क्षत्रास धिग्वचन जें हयरक्षकांचें
तें लागलें स्वहृदया शलतुल्य साचें ॥ ३१

**चंद्रकेतु**—(विस्मय करून) ताताचा प्रतापोत्कर्षही तुला सोसला नाहीं काय?

**लव**—सोसला कीं न सोसला तें असो! पण मी तुला इतकेंच विचारितों:—तो राजा फार शांत आणि नीतिमान् आहे असें ऐकतों. तस्मात् तो स्वतः कधीं असा गर्विष्ठ व्हावयाचा नाहीं, आणि त्याच्या प्रजाही तशा नसाव्या. मग, त्याच्या पदरच्या मनुष्याच्या मुखांतून अशी राक्षसी वाणी कशी निघाली बरें ?

उन्मत्त गर्वितांच्या वाणीतें राक्षसी असें म्हणती
ती कारण वैराला निरयालाही असें मुनी गणती ॥ ३२

या प्रकारें राक्षसी वाणीची जे निंदा करितात तेच चांगल्या वाणीची स्तुति करितात. ती अशी:—

प्रसवति बहु कामा घालवी दुर्दशेशीं
उपजवुनि सुकीर्ति दुष्कृतातें विनाशी ।
सतत सदय माता मंगलाचीच मानूं
सुकवि वदति वाचा सूनृता कामधेनू ॥ ३३

**सुमंत**—( मनांत ) या कुमाराचा स्वभाव परम शुद्ध दिसतो. कसा झाला तरी वाल्मीकिऋषीचा शिष्य आहे! ऋषीच्या सहवासानें याच्या मुखांतून भाषण किती प्रौढ निघतें हें !

**लव**—हे चंद्रकेतो, आपण मघां काय बोललां? कीं, ताताचा प्रतापोत्कर्ष तुला सोसला नाहीं काय, म्हणून? तर मी असें विचारितों, क्षात्रियधर्म कोणास वांटला आहे काय ?

**सुमंत**—इक्ष्वाकुकुलोद्भव जो राजा रामचंद्र त्याला तूं जाणत नाहींस, म्हणून असें बोलतोस. असो, भाषणाचा अतिप्रसंग होईल; पुरे कर आतां !

हेडोरखंकारखंको?

सैनिकांच्या प्रमथनीं पराक्रम तुझा असो

परशुराम जामदग्न्यास जो जिंकी त्याला बोल तुझा नसो ॥ ३४

लव—हे श्रेष्ठा, जामदग्न्यास जिंकणारा तो राजा, असें जें आपण बोललों, यांत मोठा पराक्रम तो काय सुचविला ?

वाणीमध्यें वीर्य आहे द्विजांचें
बाहूमध्यें राहतें क्षत्रियांचें ।
घेतां शस्त्रा जिंकिलें ब्राह्मणातें
झालें कर्म स्तुत्य हें का नृपातें ? ॥ ३५

चंद्रकेतु—( अवज्ञा दाखवून ) आर्या सुमंत्रा ! कशाला बोलतां याशीं ? पुनः पुन्हा उत्तरास प्रति उत्तर हें कशास पाहिजे ? पुरे आतां.

हा कोण संप्रति नवा पुरुषावतार !
वाटे जया न बहु भार्गवराम वीर ।
केली सुखी अभय देऊनि सत्यलोकी
जेणें तदीय चरितें हि न जो विलोकी ॥ ३६

लव—या रघुपतिचें चरित्र आणि त्याचा महिमा जाणत नाहीं असा कोण आहे ? सर्वांस विदित आहेच; परंतु मला त्याविषयीं थोडें बोलावयाचें आहे; अथवा कशाला ? असो तें.

वृद्धांची चरितें असोत कशिही तेथेंच साधू रते
केला स्त्रीवध जाहलें यश महालोकीं खरें थोर ते ।
मागें तीन पदें दिलीं खर—रणीं आश्चर्य वाटे मना
केलें कौशल वालिच्याहि निधनीं तें ठावकें या जना ॥ ३७

चंद्रकेतु—वाहवारे मुला! अमर्यादपणें गुरुजनास दोष लावून, आपली बढाइकी दाखवितोस काय ?

**लव**—अरे हा मजवरच डोळे वटारून भोंवया वर चढवितो !
**सुमंत्र**—आतां हे दोघेहीं क्रोधास चढले ! पहा !

चूडाबंधन मोकळें करितसे क्रोधामुळें कंप हा
झालीं रक्त सरोजपत्रसदृशें नेत्रें कशीं हीं पहा ! ।
यांच्या फाराचि नाचतात भुवया वक्त्रांवरी दीसते
चंद्रीं लांछनपांक्ति कीं सुकमळीं भृंगावळी भासते ॥ ३८

**चंद्रकेतु आणि लव**—( एकमेकांस म्हणतात. )
तर मग ! संग्रामास योग्य अशा मोकळ्या जाग्यावर चला जाऊं.
( असें म्हणून निघून जातात. )

---

## ११.
# केशवसुत.
### ( सन १८६५—१९०५. )

---

## १ दिवा आणि तारा.

ताऱ्याला जमिनीवरूनि वदला गर्वें दिवा हें असें:—
" अस्पष्ट द्युति ही किती तव ! तुझा रात्रौ कितीसा असे— ।
लोकाला उपयोग ? मी बघ कसा तेजा निजा पाडितों;
अंधारीं व्यवहार सर्वहि जगीं माझ्यामुळें चालतो ! ॥ १
तारा तो वरूनी दिव्यास वदला गम्भीर शान्त स्वरें
" दीपा ! तूं म्हणतोस तें कवण तो लेखील खोटें बरें ? ।

जी वस्तुस्थिति ती परंतु बघतां आहे जरी वेगळी,
अंधारावर तूझि या मम नसे बा ! योजना जाहली ॥ २
भांडीं तीं मडकीं, डबे,–ढकलिसी अंधार यांपासुनि,
ब्रम्हांडांस परंतु मी उजळितों, गेलीं युगें होऊनी;
तेजानें वरुनी दिव्या ! खुलविसी तूं मानवी चेहरे,
आत्मे उज्ज्वल आंतले पण गड्या ! होतात माझ्या करें ! ॥ ३
" ज्ञाते, आणि भविष्यवादिहि, कवी, ते चित्रकर्ते तसे,
मत्तेजें फिरतात, अन्य जन हे तूझ्या प्रकाशें जसे; ।
तूझ्या संनिध जो कवी लिहितसे त्यालाच तूं पूस रे !
' दीपाच्या लिहितोस तूं द्युतिबलें कीं तारकाच्या, बरें ? ' ४

## २ विद्यार्थ्याप्रत.

महत्त्व भारी आहे या पृथ्वीचें,
त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें;
परि तुजमध्यें महत्ताचें जें बीज
त्याहुनि कांहीं मोठी नाहीं चीजः–
ठसव मनीं हें साचें,
बापा ? हें वच बहु मोलाचे १

अग्नि असे हा तेजस्वी रे फार
त्याहुनि भारी सूर्य नभींचा थोर;
परी किरण जो तुजमध्यें सत्याचा
प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचाः–
घोक सदा हें वाचें
बाबा ! हें वच बहु मोलाचें २

पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत;
आकाशीं तर असंख्य दिसताहेत;
परि एक रत्न तुजमध्यें जें सच्छील
कोणाला नच सर त्याची येईल;
स्मरण असूं दे याचें
बाबा ! हें वच बहु मोलाचें ३

स्नायूंमध्यें पुष्कळ आहे शक्ति,
नृपवक्त्रीं तर फारच आहे, म्हणती;
परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी !
पठन तर करीं याचें,
बाबा ! जग हें बदलायाचें ! ४



## १२.
# राम गणेश गडकरी.
( सन १८८५–१९१९. )

## १ कळयांचीं फुलें कशीं झालीं?

[ ला बाइला० ही चाल–थोडा फेरफार करून. ]

बाळ कुणी । संध्याकाळीं रमे गुणी
खेळतसे । बाळ आंगणीं हवें तसें ।
बागेंत । मौजेनें झोंके घेत
तों दिसली । सुंदरशी त्याला वेली ।
देंठ कोवळे । हिरवे पिवळे । नाजुक सगळे
ती वेली । हिरवा शालू पांघरली ॥ १
परी तया । हवा सोबती खेळाया
खेळगडी । मूल फल सुंदर जोडी ।
पाहतसे । परि वेलीला मूल नसे
तिच्या कळ्या । होत्या मिटलेल्या सगळ्या ।
जणुं दमल्या । फार खेळुनि; मग निजल्या
हवेंत डुलणें । हेंच खेळणें । खेळुनि निजणें ।
ही त्यांची । गादी हिरव्या पानांची ॥ २
बाळ गुणी । वाइट वाटे फार मनीं
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ।

झोंपेंत । कितिदां गेला बागेंत
धीर कुठें । पहांट होता बाळ उठे ।
बागेंत । धांव तसाची तो घेत
मौज तों किती । कळ्या न दिसती । फुलेंच हंसतीं ।
बाळ डुले । चहूंकडे पाहून फुलें ॥ ३

आईला । शोधाया धांवत गेला
मग बोले । " आई बघ हीं गोड फुलें ।
काल कळ्या । आज फुलें झाल्या सगळ्या
कशा उमलल्या । कुणीं हंसविल्या । हांसत बसल्या ।
कशा कळ्या । आई सांग मला सगळ्या " ॥ ४

मग आई । बाळाला उत्तर देई
" खेळासी । जमति चांदण्या आकाशीं ।
त्या हंसती । चहूंकडे पाहत बसती
तों दिसल्या । कळ्या बिचाऱ्या हिरमुसल्या ।
कळवळल्या । फार चांदण्या मग रडल्या
आंसू पडले । ते दंव झाले । धांवत आले ।
भुईवरी । पडले साऱ्या कळ्यांवरी ॥ ५

तो साचा । रंग पांढरा तारांचा
कळ्यांवरी । चहूंकडे जाउनि पसरी ।
मग हंसल्या । कळ्या फुलें हंसतां झाल्या "
सर्व असें । आई बाळा सांगतसे ।
ऐकुनि हें । बाळ तिच्या वदना पाहे

कां न कळे । मिठी मारिली तिला बळें ।
त्या काळीं । आई आनंदें हंसली
हंसतां रडली । असवें पडलीं । त्याच्या गालीं ।
तों साची । कळी उमलली बाळाची ॥ ६

## २ चेंडू.

खेळत होता बाळ आमुचा चेंडू घेवोनी
पाहत होतों आम्ही दोघें आनंदें वरुनी,
अडगळ होती भंवतीं परि तो लक्ष्य न दे तिकडे
हांसे, धांवे, खेळे, उडवी चेंडू चोंहिकडे.

तन्मय होउनि खेळत होता यापरि स्वच्छंदें
पाहत होतों आम्ही त्यातें तशाच आनंदें,
पाहि तिजकडे कां न कळे तों हांसूं येत मला
परि तें कळुनी तिला तिच्याही खळी पडे गाला !

इतक्यामध्यें चेंडु उडाला अडगळींत पडला
बघे बाळ चहुंकडें जरी तरि मिळे न तो त्याला.
निराश झाला, थकुनी बसला, बाळ जरा रडला
रडत रडतची फिरुनि लाडका लागे शोधाला.

लक्ष्य देउनी फार शोधितां अवचित सांपडला
हंसत लाडका खेळामाजीं फिरुनि दंग झाला.
निःश्वासातें सोडित मी हा प्रकार पाहोनी
पाहे ती मजकडे वदें मी तन्मन जाणोनी.

" खेळत आहों असेच आपण अतीव आनंदें
बागडतो हा चेंडु आपुला असाच स्वच्छंदें.
परि संसारीं बहु दुःखांची अडगळ ही साच
एके दिवशीं बाळहि जाइल चेंडुसारखाच !

रडत बसूं मग असेंच आपण प्रिय बाळासाठीं
फिरुनि हंसूं का असेंच ?—परि हे; आशा ती खोटी "
तोंच वदे ती " पुरे गडे हें बोलुं नये असलें "
बघें मजकडे रागानें परि हंसतहि प्रेमबळें.
पाहत होतों असेंच आम्ही कांहीं दिन जातां
त्या दिवसाची स्मृति होउनि ती भग्न करी चित्ता.

१३.

## दत्तात्रय कोंडो घाटे.

(सन १८७५–१८९९.)

### विश्वामित्राच्या कांठीं !

(स्थळ–बडोदें येथील कमिटी बागेंतील झुलता पूल.)
(वेळ–पौर्णिमेची चांदणी रात्र.)

(चाल—फुलें वेलीचीं.)

बघुनि मन धालें
साफल्य दृष्टिचें झालें ! ध्रु०
पाउस बर्फाचा जणुं पडतो;
रजताचा जणुं मेघ वितळतो;
किंवा चंद्रमणि पाझरतो;
जणूं शीतांगी–
मत्प्रिया मला आलिंगी ! १

शीतल चंदनरसांत पडलों;
अथवा अमृतडोहिं बुडालों;
किंवा सुख–स्वप्नीं सांपडलों;
न कळे कांहीं–
जिव वेडावुनि हा जाई ! २

शांतिदेवता निराकारिणी
वसते जणुं या मंगल स्थानीं;
सांगे मजला या उद्यानीं,
" चंचल बाला !
बघ इथें जगन्नाथाला ! " ३

सृष्टि सुंदरी नटली थटली,
सूक्ष्म धवल वल्कला नेसली;
खुलली जणुं समवेली फुलली;
रम्य ही शोभा–
हिजपुढें काय ती रंभा ! ४

शांत तटिनि, जणुं पथ स्फटिकाचा
जातिपुष्प–पथ वनदेवींचा
किंवा ओघ सजिव रजताचा
कीं रत्नाची–
मेखलाच उद्यानाची ! ५

विश्वामित्रीजलिं या कालीं
तटवनभूमी बिंबित झाली;
वरतीं तैसें दिसतें खालीं;
अद्भुत झालें–
पाताळ आज पाहीलें ! ६

तारांगणही स्पष्ट बिंबलें,
स्नाना जणुं हे मुनि अवतरले;
तेजोनिधि कीं ऋषी बैसले;

ध्यान धरोनि–
जलसमाधिस्थ होवोनी ! ७
शशिरायाही आंत उतरला,
कलहंसापरि पोहुं लागला;
तटिनीनें जणुं हृदयीं धरिला;

प्रेमळ कांत–
पाहुनी इथें एकांत ! ८
जेथें असली श्रेष्ठ मंडळी,
तिथेंच गरिबा जागा दिधली;
शंका सखये ! परि उद्भवली,

खरी मम काया–
उदकांमधिं वा भूवरि या ! ९
वरतीं खालीं दिसतें गगन;
मध्यें लंबित अपुलें भवन;
वातावरणीं आधाराविण

गोजिरवाणी–
फेकिला चेंडु हा कोणी ! १०
वरतीं खालीं ही शशिकांती;
द्विगुणित शोभा द्विगुणित शांती;
द्विगुणित आनंदाची भरती,

दृष्टि बावरली–
वर पाहूं किंवा खालीं ! ११

स्मरणशक्तिके ! जागृत होई;
दर्शनदुर्लभ शोभा पाहीं,
विसरुं नको बघ यांतिल कांहीं;
वारंवार–
कोठुनी असें दिसणार ? १२

---

## १४.

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

( सन १८७१ )

—:*:—

## आगगाडी.

( उपजाति )

ही लोहरथ्या जणुं दीर्घ नाडी
स्वदेशदेहीं पसरे प्रचंडीं,
द्वारें जिच्या पोषक सत्त्व ओढी
अहर्निशीं सत्वर आगगाडी. १
ज्या पार्श्वभागीं दिसतात तारा,
विद्युज्जवें वाहति वृत्तभारा,
तारा न त्या; देशतनुप्रदेशीं
ही ज्ञानतंतुप्रसृतीच खाशी. २

कन्याकुमारी द्रववावयातें
हिमाद्रिचें अंतर दृष्टिपातें
जो उत्तराशेरित रम्य फेंकी,
कटाक्ष तो हा पथ आक्रमी कीं. ३

ही सप्ततंत्री जणुं लोहरथ्या,
कीं सृष्टि जीच्यावरि शीघ्रगत्या
निजांगुलि प्रेमळ चालवीते,
गभीर उत्पादित सुस्वनातें. ४

जेव्हां तमोव्याप्त धराप्रदेशीं
धांवे निशाकालिं महोरगीशी,
फूत्कार अंगारकणांहिं पूर्ण
नासामुखें सोडित तैं विकीर्ण. ५

दिव्य ग्रहांची रविपूर्व माला
शौरीसि कीं लक्षुनि जावयाला
धांवे, प्रियाबाहुलताच जैशी
पडावया वल्लभकंठदेशीं. ६

तेजःकणांनीं नभ पूर्ण साचें
दिसे निळें पातळची बुट्यांचें;
शोभे जरीचा जणुं कांठ त्यासी
प्रकाशमान् अग्निरथ प्रवासीं. ७

सशृंखला, आयससांधि, दीर्घा
श्रेणी रथांची गमते सवेगा

कीं बद्धहस्ताब्जतला सलीला
नृत्यीं रता नूपुरपाद बाला. ८
बांधोनिया मंजुळ पायिं चाळ
हातांत घेवोनि तसेच टाळ,
कीं ईशनामीं रत भक्तवृंद
क्षेत्रासि जाई गतिनें अमंद. ९

---

## १५.

# अनंततनय.

## ( सन १८८१. )

—:*:—

## वरची वाट.

पद [ चालः-घनश्याम सुंदरा श्रीधरा..... ]

सौख्यकदंबा नगरी रंभा रम्या मुंबापुरी,
मयासुराची मोहमयी ही कन्या गुणसुंदरी ॥ ध्रु० ॥
अमरेन्द्राची अमरावति कीं रावण-लंकापुरी,
कनकभूषिता द्वारावतिची प्रतिमा जणुं दूसरी;
इन्द्रप्रस्थाची ही किंवा कांति काढिली जणूं,
कमनीयाकृति कैलासचि कीं तळीं उतरला म्हणूं;
लावण्याची लोचनलुब्धक ललिता लतिका नवी,
भान हरपवी मती गुंगवी मनोमधुप मोहवी;

जिकडे तिकडे एकसारखीं उंच उंच मंदिरें,
सानु–श्रेणीपरी पसरलीं गगनचुंबि गोपुरें;
स्तिमित विस्मयें होउनि बघतां मान उचलुनी वरी,
शिरोविभूषण पडे मागच्यामागें न ठरे शिरीं !
विविध ध्वनिंच्या कोलाहलें या शब्द न कर्णीं पडे,
नीट एकही न ये आयकूं, बसले जणुं कीं दडे;
अध्वनिकारी रथ अश्वांचे पवनजवें धांवती,
मागुनि पुढुनी एकामागें एक भराभर किती !
त्यांतचि पळतीं चक्रवाहनें फटफट रव चालतो,
वहनशतें ही बघतां होतो घामाघुम जीव तो !
स्वैतोगतिक किति त्यांत धांवती घणघण घंटा झडे,
न कळे जावें कसें कुठोनी हृदय किती धडधडे !
फेरीवाला मधेंच कोठें अस्फुट बडबड करी,
सोत्सुक पाही अनभ्यस्त नर उगीच वेड्यापरी ! १
मीहि होतों असाच नवखा विपरित झाली परी,
भांबावुनियां गेलों पाहें भिरभिर खालीं वरी !
झालों होतों किती मुंबई उत्सुक पाहावया,
हौस सर्व परि जिरली, मन्मन इच्छी परतावया.
मुंबईस ही पहिलिच होती वेळ यायची खरी,
परतायातें वाट न गवसे झाली मति बावरी !
संगे होते चार सोबती सर्वाचि माझ्यासम,
जरि धीराचे घाबरले ते जमे न कांहीं जम;

---

१ 'रबरटायर' च्या घोड्यांच्या गाड्या. २ बायसिकली. ३ मोटार.

पत्ता होता लिहुनि आणिला तो न कुठें सांपडे,
काय करावें पुढें कळेना कोडें मोठें पडे !
काय भूल तैं पडली न कळे चुकून पत्त्यांतलें,
स्मरे न मजला एकहि अक्षर वेडें मन जाहलें.
चक्र रथाचें भूनें गिळितां कर्णाची जी गती,
झाली माझी तशीच अगदीं जागृत हो न स्मृती !
मुंगुस असतां समयपरत्वें यावें तोंडीं जसें
' सुमंग गुंमुस मुसुंग घुमुसहि ' झालें माझें तसें !
' बोलघुमट ' कीं ' गोलघुटम ' कीं ' वर्तुलगुत्ता ' 'पिठा',
असें वदत मी किती जिवाचा केला आटापिटा !
घर्म दरदरा सुटला, गात्रें शिथिल जाहलीं किती,
चमचम डोळ्यांपुढें काजवे माझ्या ते चमकती !
पडे कोरडी जीभ, बोबडी वळली माझी पुरी,
कर पद गळुनी सांधे धरले भ्यालों बहु अंतरीं ! २
भीषण जीवनसंग्रामीं या मुंबईस त्यांतुनी,
कोण कुणाची करी चवकशी उगिच उभें राहुनी !
जो तो असतो कार्यनिरत कीं आपआपल्यापरी,
उसंत कोणा पसंत जरि ही मौज पहाया तरी;
सुदैव अमुचें निकट आमुच्या बाळ तेधवां कुणी,
पहात होता मौज आमुची तेथ उभा राहुनी;
एकामेकां घट्ट धरोनी आम्ही मार्गावरी
उभे पाहुनी हांसत होता आम्हां वरचेवरी !

वेडीं आम्ही जणूं श्वापदें भित्रीं रानांतलीं,
पाहुनि ऐसीं घाबरलेलीं मौज तया वाटली.
काडीच्याही आधारातें बुडता घेतो जसा,
सहाय त्याचें मिळवायाला मीही पाही तसा.
उसना तेव्हां धीर आणुनी सहज जणूं त्या पुसें,
'बाळा, वरची वाट सांग ही कोठें मज जातसे?'
सस्मित करुनी थोडी मुद्रा पहात गगनीं मुदें,
'वरची ही ही? वरची हो का?' बालक मजला वदे;
'आभाळीं ही सरळ जाउनी जाते आणिक वरी.
लांब लांब हो खूप लांब हो अशीच बाप्पा—घरीं!' ३

---

## १६.

# नारायण केशव बेहेरे.

## (सन १८९०)

## होनाजी बाळ.

### (साक्या.)

"घनश्याम सुंदरा, श्रीधरा! अरुणोदय झाला
उठि उठि बा वनमाली! उदयाचलीं मित्र आला."

× × × ×

रोज उगवतो, मावळतोहीं फरक जीवनीं काय?
वीरत्वाचें कवन कशाचें? रडणें नशिबीं धाय! ॥१

तीच चाकरी, तीच भाकरी, तीच शृंखला पायीं
कशी स्फुरावी प्रतिभा–ज्योती ? जीवन तिजला नाहीं ! ॥ २
घरांत बसुनी रडे कोंबडा, वा मंडुक कूपांत
वीरश्रीच्या वृथा वल्गना खुलतिल कां काव्यांत ? ॥ ३
शेंदाडांची मर्दुमकी नित चुलीजवळ ती चाले
समशेरींची लखलख कुठली, वा बोथाटी, भाले ? ॥ ४
अबलांवरती शौर्य गाजवूं, करूं गर्जना भारी
स्वप्नीं ना परि ऐकूं येई कोणाला रणभेरी ॥ ५
तुझ्यासारखे बोल कोठुनी कवि होनाजी बाळा !
स्फुरतिल आतां मम हृदयीं जरि उदयाचलिं रवि आला ! ॥ ६

× × × ×

ददात नव्हती अन्नाची वा वस्त्राची कोणाला
सृष्टिसुंदरीसवें खेळण्या मोद होय हृदयाला ॥ ७
तुच्छ जगाला वीर लेखिला धरुनि कास सत्याची
जीव वेंचणें धर्मापायीं, पूर्ती ही आशेची ! ॥ ८
सूर्य उगवता वाटे त्यांना प्रीतीचा, सत्याचा
स्वातंत्र्याचा स्वामी जगतीं, मारक अंधाराचा ॥ ९
सूर्य उगवता जीवन घाली मृत बनल्या सृष्टींत
म्हणुनि दर्शनें पुलकित होती वृत्ती एक निमिषांत ॥ १०
सृष्टी रंगे, मोदें नाचे विश्व सकल पाहून
कविची प्रतिभा स्फुरते, गाते गाणीं आनंदून ॥ ११
भ्रांत पडे अजि पोटाची बा कवि होनाजी बाळा ! ।
सृष्टिगीत मी गाऊं कसें जरि उदयाचलें रवि आला ! ॥ १२

× × × ×

हौस पुरविण्या प्रिय दयितेची म्लेंच्छ–छावणी लुटती
डेऱ्यावरच्या सुवर्ण–कळसां खुशाल घेउनि येती ॥ १३
त्या कळसांचे अलंकार नव घाली दयितेवरती
शूर मराठा, शूर तयाच्या शृंगाराच्या रीती ॥ १४
नेत्र वांकडा करुनी कोणी जर दयितेला पाही
फोडुनि टाकी नेत्र ! अन्य त्या पिनलकोड ही नाहीं ! ॥ १५
शत्रूंच्या रुधिरानें भरल्या हातांनीं दयितेची
वेणी गुंफी ! हीच कल्पना त्याच्या शृंगाराची ! ॥ १६
पुरुष–वेषही घेउनि जाई हवा पतीसह खाया
निज वक्षावर वार सोसुनी वांचविते पतिराया ॥ १७
शृंगाराच्या गोड लावण्या कवि होनाजी बाळा !
गाउं कशा मी या वेळीं ? जरि उदयाचलिं रवि आला ! ॥ १८

× × × ×

निघे मराठा काढुनि छाती वारूवर डौलानें
समशेरीला सखी मानिली, कट्यार कन्या त्यानें ॥ १९
रंग केशरी जोहाराचा, शिरीं दुपेटा झळके
हृदय फांकडें ऐटी, परि तें स्वदेशकार्यीं बांके ॥ २०
महाराष्ट्र हा देश आमचा रोमांगीं हें भरलें
तेच निघाले बोल मुखांतुनि कृतिचें प्रेरक झाले ॥ २१
देशासाठीं खुशाल उडवी रक्ताचीं कारंजीं
शीर्ष तोडुनी सुखें अर्पितो भूमातेला रुंजी ॥ २२
स्वातंत्र्याची फुलें वाहण्या मायभूमिच्या पायीं
वीर मराठे बागडती ते तेव्हां ठायीं ठायीं ॥ २३
वीर रसाची गाणीं गाशी कवि होनाजी बाळा !
गाउं कसे मी पोवाडे जरि उदयाचलिं रवि आला ! ॥ २४

## १७.

# आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

(सन १८८८.)

—:x:—

## प्रेमाची खूण.

संतत वाहे यद्‌-हृदयांतुनि विमल प्रेम निर्झर
त्रिभुवनीं धन्य धन्य तो नर ॥ धृ० ॥
पितरांचा उद्धार कराया, दृढ निश्चय अंतरीं
धरुनियां यत्न भगीरथ करी
अगणित वर्षें घोर तपाला आचरिलें त्या तदा
लेखुनी तुच्छ जीव-संपदा
प्रसन्न होउनि प्रभू तयावरि, अमृत-निस्यंदिनी
स्वर्गीची दिधली मंदाकिनी
उद्धरो न अथवा पितर तयाचे तयें
त्या इष्ट फलाचा हो न मोद वा स्वयें
तत्कौतुक जगतीं करो न कुणि विस्मयें
तत्प्रेमाची खूण जाह्नवी अहा! महीवरि परी
अहर्निश पतित जनां उद्धरी १
कृष्ण सारथी करुनि धनुर्धर पार्थ वीर नरमणी
ठाकला युद्ध कराया रणीं
प्रतिपक्षावरि दृष्टि फेंकतां आप्तगणाचि देखिले
तन्मना संमोहें व्यापिलें

या मायेंतुनि मुक्त कराया भगवंतें त्याजला
पाजिली बोध-सुधा निर्मला
अशि पुराणांतरीं सुरस कथा वर्णिली
ती खरी असो वा नसो, कुणीं पाहिली
तीवरुनि जवनिका काळानें ओढिली
आज परी ती जडासही कीं चैतन्या देतसे
म्हणुनि ही प्रेम-खूण गमतसे २
वृद्धपणीं निज मातापितरां दुःख देइं अंतरीं
छळुनियां पुंडलीक बहुपरी
प्रिय रमणीच्या प्रणय-भाषणीं दक्ष राहि सर्वदा
वाहुनी सर्वस्वा तत्पदा
यौवनधामीं उच्छृंखलता जडतां अंगीं पुरी
मनुज तो विमार्ग-पथ आचरी
अंधार जाउनी प्रकाश ये भूवरी
जरि रत्न मलिन, जगीं तेज दावि कधिं तरी
या न्याया पुढतीं तज्जीवन स्वीकरी
'विठ्ठल' 'विठ्ठल' सदैव हा जो घोष अंबरीं भरे
कशाची खूण असे ही बरें? ३
नाशवंत जड तनू जिवाची, जाते, जाइल लया
नियम हा काळाचा जगतिं या
जाणें हें जो स्वयंस्फूर्तिनें त्याच विमल अंतरीं
वसतें विश्वबंधुता खरी
स्थिर चर भेद न, जगत्रयाचे आत्मे लय पावती

या मायेंतुनि मुक्त कराया भगवंतें त्याजला
पाजिली बोध–सुधा निर्मला
अशि पुराणांतरीं सुरस कथा वर्णिली
ती खरी असो वा नसो, कुणीं पाहिली
तीवरुनि जवनिका काळानें ओढिली
आज परी ती जडासही कीं चैतन्या देतसे
म्हणुनि ही प्रेम–खूण गमतसे २
वृद्धपणीं निज मातापितरां दुःख देइ अंतरीं
छळुनियां पुंडलीक बहुपरी
प्रिय रमणीच्या प्रणय–भाषणीं दक्ष राहि सर्वदा
वाहुनी सर्वस्वा तत्पदा
यौवनधामीं उच्छृंखलता जडतां अंगीं पुरी
मनुज तो विमार्ग–पथ आचरी
अंधार जाउनी प्रकाश ये भूवरी
जरि रत्न मलिन, जगिं तेज दावि कधिं तरी
या न्याया पुढतीं तज्जीवन स्वीकरी
‘ विठ्ठल ’ ‘ विठ्ठल ’ सदैव हा जो घोष अंबरीं भरे
कशाची खूण असे ही बरें ? ३
नाशवंत जड तनू जिवाची, जाते, जाइल लया
नियम हा काळाचा जगतिं या
जाणें हें जो स्वयंस्फूर्तिनें त्याच विमल अंतरीं
वसतें विश्वबंधुता खरी
स्थिर चर भेद न, जगत्रयाचे आत्मे लय पावती

तदात्मीं, प्रेमें सुख भोगिती
तत्प्रीति मंगळा दिव्य रूप घेउनी
जोंवरी विहरती रविशशी तेजोमणी
करुं शके न कालहि निरोध तिज कोपुनी
धन्य जननि ती ! धन्य काळ तो ! धन्य धन्य ती क्षिती !
कीं असें प्रेम–चिन्ह प्रसवती ! !

---

## १८.

# माधव गोविंद भिडे.

### ( सन १८८८. )

—:*:—

## चंडोलास.

आलासी सखया ! फिरोनि विहगा ! गायास येथें अहा !
माझें भाग्यचि थोर ! कीं प्रिय तुझा सद्वृक्ष पैलींच हा.
येवोनी घनवृंद कुंद बघ ही झाली हवा त्रासदा.
आपत्तींतच भेटण्या सुखविण्या सन्मित्र येती सदा. १

चंडोला ! रडक्या मुलास जन ते देती अफू वा ! जशी
तूंतें अर्पितसे मदीय जननी मातें पहा हे तशी.
त्या रेमाजि अफूचिया मग उगीं तीं बालकें राहतीं.
गानीं मी तव गुंगुनी विसरुनी जातों मदीय स्थिति. २

विश्वाऽम्बा मम थोर ती म्हणुनियां दे शांतवाया सुधा
पाहे भूल न आणण्या अफुपरी द्याया विषें ती मुधा
व्हावी ते जननी तरी बघ अशी ज्ञानेंच जी तोषवी
रामाईविण सांग तूंच विहगा ! चंडोल ती कोण वी ?

चंडोला ! तव वर्णही निरखितां खासा अफूसारिखा
तूंही वृक्षिच वाढसी गमसि तूं त्या आफिमीचा सखा,
निद्रा आणितसे अफू शिशुजनीं, ती योगनिद्रा खरी
आणोनी, कविची प्रवर्तविसि तूं गानीं पहा वैखरी !

तूं मातें प्रसवावया मधुमधु प्रोत्तुंग आलाप ते
चंडोला ! रसिका ! समर्थ करिसी गावोनि गीतीपते !
सृष्टीच्या प्रिय गायका ! रसवती ऐसी तुझी कोमला
तत्रापि प्रियवल्गुवाग्वितरणीं देते मला ती बला.

म्यां गावें तुजमागुनी खगवरा ! त्वच्छिष्य होवोनियां
इच्छापूर्ति करावयास्तव तुला मी प्रार्थितों गावया.
गा ! गा ! गा ! विहगा ! सुधामधुर तीं स्तोत्रें प्रभूचीं नवीं
स्तोत्राज्ञा–परि तें बळी नच दुजें, काळास जें कांपवी !

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३९५५

## मॅट्रिक्युलेशन मराठी गाईड.

गेल्या वर्षींच्या अनुभवावरून यंदा सदर गाईड अत्यंत महनेतीनें तयार केलें आहे. सदर गाईड प्रश्नोत्तर पद्धतीनें लिहिलें असून लेखकांचीं चरित्रें, शब्दार्थ कवितांचा अर्थ, समास, शुद्धलेखनाची माहिती, निबंध कसा लिहावा वगैरे गोष्टी गेल्या वर्षींच्या प्रश्नपत्रिकेला धरून लिहिल्या आहेत. पृष्ठें १५० ते २००. इतर सर्व नोटस मिळतात.

**विश्वनाथ गणेश आणि मंडळी, पुणें.**

# IN WILD MARATHA BATTLE

## शिवाजीचा उजवा हात.

In Wild Maratha Battle या मॅट्रिकच्या टेक्स्टचें मराठी रूपांतर छापून तयार किं. १ रुपाया. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

# CALCUTTA BANARJEE NOTES.

कलकत्त्याच्या पी. घोष आणि कंपनीच्या मॅट्रिकच्या टेक्स्ट वरील नोटसचा आमचे कडे भरपूर साठा आहे. आठ आण्याची तिकीटें पाठवून मागणी करा.

# VASWANI NOTES.

मॉडर्न पब्लिशिंग कपंनीनें प्रसिद्ध केलेल्या सर्व प्रकारच्या नोटस् आमचेकडे विक्रीस ठेविल्या आहेत. आठ आण्याचीं तिकीटें पाठवून तावडतोब मागणी करा.

## शिक्षकांस नम्र विनंति.

आपण मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांकरितां कांहीं नोटस् व पुस्तकें प्रसिद्ध केल्यास तीं विकण्याची आम्ही खटपट करूं. पुस्तकाला नांव देण्यापासून तो छापण्याच्या खर्चापर्यंत सर्व प्रकारच्या (खपविण्याच्या दृष्टीनें) सल्ला आम्ही देतों. तरी पत्रव्यवहार करून फायदा करून घ्या.

पत्ता–
१२ बुधवार, पुणें.

विश्वनाथ गणेश ताम्हणकर,
माजी शिक्षक न्यू. इं. स्कूल, पुणें.

REFBK-0003155
REFBK-0003155